

# चिंतनातील विचार

ऑड. रुपेश पवार



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

लेखसंग्रह

# चिंतनातील विचार

लेखक : अॅड. रुपेश पवार

# चिंतनातील विचार


## लेखक : ॲड. रुपेश पवार

पत्ता: ठाणे

मोबाईल : 9930852165

ई मेल : rupesh.b.pawar@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

Whatsapp: 9987737237

esahity@gmail.com

प्रकाशन : १ मे २०२२ (महाराष्ट्रदिन)

©esahity Pratishthan®2022

ई साहित्य प्रतिष्ठान हे एक मुक्त विचार व्यासपीठ आहे. या पुस्तकात मांडलेले विचार हे त्या लेखकाचे असून सर्वच विचारांशी/ मतांशी/ संशोधनाशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कलामय ओळख




माझे मित्र साहित्यिक पत्रकार ॲड रुपेश बी पवार ठाण्यात गेल्या वीस वर्षापासून ते साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात कार्य करतात. यांनी पाचशेहून अधिक ललित लेखांचे तसेच चारशेहून अधिक कवितांचे लेखन केले आहे. या लेखनातून आत्तापर्यंत रुपेशजींनी पाच पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात दोन काव्यसंग्रह, एक ललित संग्रह, एक कथासंग्रह आणि एक संपादकीय लेखसंग्रह प्रकाशित केले आहेत. एक सामाजिक, कौटुंबिक नाटक रुपेश पवार यांनी लिहिले आहे. त्याचप्रमाणे ते गेल्या पाच वर्षांपासून चित्रपट कथा, गीतलेखन करत आहेत. या अष्टपैलू कार्यामुळे रुपेशजींना आतापर्यंत ३० पुरस्कार लाभले आहेत. झी २४ तासने या कार्याची दखल घेऊन रुपेश यांना मुलाखती करता निमंत्रित केले होते. ते अस्थिव्यंग या प्रकाराने अपंग आहेत. २०१३, १४ पासून मी रुपेश यांना ओळखत आहे. ते विविध साहित्यिक कार्यक्रमांचे संयोजन करतात, अनेक कार्यक्रमात रुपेशजींचा सहभाग असतो.

त्यांची पुस्तके पुढील प्रमाणे नशा, अंतरंग काव्यसंग्रह, वलयांकित ललित संग्रह, मनोगाथा कथासंग्रह, प्रतिभावंतांच्या रंगसावल्या संपादन संग्रह आणि आता प्रकाशित झालेला चिंतनातील विचार, अशा सहा साहित्य कलाकृती रुपेश पवार यांच्या नावावर आहेत.

साहित्यिक, समाजसेवक

राजेंद्र मधुकर सावंत

+918693012316

## अर्पण पत्रिका

इतिहासाच्या पाऊलखुणा
चिंतनातील विचार हा
गतकाळातून प्रेरणा घेऊया
मानवतेने आज जगूया
स्वराज्याचा मूलमंत्र जपूया
राष्ट्र धर्म हा वाढवूया
हाच विचार या मातीचा
तोच मांडला आज इथे हा
प्रणाम करतो वाचक रसिका
हा अनमोल ठेवा आपण जाणावा

# प्रस्तावना :- चिंतनशील लेखक

साहित्यिक पत्रकार ॲड. रुपेश पवार यांचे 'चिंतनातील विचार' हे पुस्तक अत्यंत वाचनीय झाले आहे. या आधी ललित, काव्य या साहित्य प्रकारानंतर श्री रुपेश पवार यांनी ऐतिहासिक चींतनावरील लेख या पुस्तकात लिहिले आहेत. या लेखात चिंतनातील विचार तर दिसतातच पण विचारातील चिंतन ही दिसून येते. त्यामुळे या लेखसंग्रहाला दिलेले शीर्षक अगदी योग्य आहे.

ऐतिहासिक लेखमालेचे हे पुस्तक अतिशय अभ्यासपूर्ण लिहिले आहे. काही ठिकाणी लेखक ऐतिहासिक दाखले, पुरावे देतात. या लेखांमध्ये एकाच विशिष्ट काळाचा विचार न करता शिवकाल, मुघलकाल, मध्ययुगीन इतिहास काल ही आहे, तर अलीकडचा गांधी विचार ही मांडलेला दिसतो. समर्थ रामदास स्वामींनी अपेक्षिलेले कल्याण कारी राज्य शिवाजी महाराजांनी उभारतानाचा त्यांचा विलोभनीय जीवनपट लेखक मांडतात.

महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभली आहे. वारकरी संप्रदायाने समाजाला विविधतेत एकता शिकवताना एकात्म ईश्वर संकल्पना सांगितली आहे. लेखक तीच संकल्पना वाचकांपर्यंत पोचवतात. आपल्या

पुराणग्रंथांचे उदा. भगवतगीता यांचे पारायण न करता ते जीवनाचा अविभाज्य भाग व्हावे. यातून कर्म सिद्धांत जनसामान्यांसमोर पोचावा, हा लेखकाचा हेतू आहे. लेखकावर सदगुरु वामनराव पै यांचा प्रभाव आहे. म्हणून जीवनविद्या मिशनचा प्रवासही या पुस्तकात आणलेला दिसतो.

इतिहास व सद्यस्थितीची तुलना शहाजी राजे जिजाऊ व हल्लीचे आई वडील या लेखात लेखक मांडतात. यातून सध्याच्या आई वडिलांसाठी तो एक चिंतनशील विचार ठरेल. विद्यार्थ्यांना निबंध लिहिताना या पुस्तकातील लेखांचा नक्कीच उपयोग होईल. त्याकरता लेखक रुपेश पवार यांना खूप साऱ्या शुभेच्छा

शिक्षण तज्ञ
डॉ. सौ प्रतिक्षा बोर्डे

# इतिहास एक चिंतन



ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रकाशक नामकाका हे प्रत्येक कवी, लेखकाला प्रोत्साहन देतात. त्यांच्यामुळे आपल्या साहित्य कलाकृतीचे सोने होणार असे प्रत्येकाला विश्वासाने वाटत असते. या वाटण्यातच नामकाका विजयी आहेत. असा लौकिक नामकाकांनी मिळवला आहे. यामुळे माझी दुसरी साहित्य कलाकृती मी पुन्हा नामकाका यांच्याकडे सोपवली. मी वीस वर्षापासून साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात कार्य करतो आहे. आत्तापर्यंत माझे विविधांगी लेखन झाले आहे. वेगवेगळे सामाजिक भावनिक विषय मी हाताळले आहेत. 'अंतरंग' या काव्यसंग्रहातून माझे प्रकाशित साहित्यक्षेत्रात पहिले पाऊल पडले. त्यानंतर मला 'वलयांकित' ललित लेखसंग्रहाचा संवेदनशील लेखक म्हणून ओळख मिळाली. मग माझा उल्लेखनीय साहित्य प्रवास सुरू झाला. या साहित्य प्रवासात

माझ्याकडून सहा पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे. त्यात 'मनोगाथा' हा कथासंग्रह साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केला. त्याचबरोबर आत्ताचा हा 'चिंतनातील विचार' हा इतिहास विषयक ललित संग्रह साहित्य प्रतिष्ठानकडून प्रकाशित झाला आहे.

मित्रांनो मला बालपणापासून इतिहासाची आवड होती. त्यामुळे मी कायम ऐतिहासिक घटनांमध्ये रमत होतो. इतिहास हा माझ्यासाठी मनोरंजनाचा विषय नव्हता. तो माझ्या वैचारिक प्रतिभेचा विषय होता. म्हणजे त्या वेळेची समाज रचना कशी होती,त्यावेळचे राजकीय, व्यापारी धोरण कसे होते, इतिहासात आदर्श राजवटी कोणत्या होत्या, त्यांनी त्यावेळच्या समाज जीवनात कसा व कोणता बदल घडवून आणला, त्यावेळेचे कोणते सम्राट कार्यसम्राट होते, कोणत्या सम्राटांनी आपल्या सत्तेचा कसा गैरवापर केला. याबद्दल कायम मी विचार करायचो. पुढे ही आवड माझ्या शिक्षणाचा भाग बनली. म्हणजे महाविद्यालयात असताना मला इतिहास हा अभ्यासाचा विषय होता. म्हणून मी इतिहास या विषयातूनच बी, ए केले. असा माझा वैचारिक प्रवास आहे.

या महाविद्यालयीन इतिहास विषयात विविध प्रकाराने इतिहासाचा अभ्यास करावा लागतो. विचारपूर्वक ऐतिहासिक घटनांना मांडावे लागते. लेखक ज्या पद्धतीने एखाद्या घटनेचा आढावा घेतो. त्याच पद्धतीने

विद्यार्थ्यांना उत्तरातून आढावा द्यावा लागतो. प्रश्न कोणत्याही प्रकारे विचारले जाऊ शकतात. एखादा प्रबंध किंवा एखादे भाषण जसे लिहावे तसेच उत्तरला मांडावे लागते. हे मी शालेय जीवनातच करत होतो. त्यामुळे मला हे पुढे सहज शक्य झाले. म्हणून मी 'चिंतनातील विचार' हा विषय ठाणेवैभव दैनिकात लिहिला. त्यातून मी माझ्या इतिहास विषयक प्रतिभेला आजमावले. मी या आधी लिहिलेल्या प्रत्येक लेखात इतिहासाचे दाखले देत आलो आहे. कारण प्रत्येकाने इतिहास वाचला पाहिजे. त्या इतिहासात नुसते रमुन न जाता, आताच्या परिस्थितीत आपण इतिहासातून काय घ्यावे. त्यातून आपले सामाजिक जीवन व्यक्तिगत जीवन कसे घडवावे, याचा विचार सर्वांनी करावा. या हेतूने मी इतिहासाचा वापर करत असतो.

परंतु काही भावनिक लघुकथा, अभंगांचे भावार्थ लिहीत असताना. एके दिवशी माझ्या मनात विचार आला. आपण इतिहास विषयवर एक सदर लिहूया. मग मी त्या संदर्भात विचार करू लागलो. त्यातून दहा विविधांगी विषय एकामागोमाग एक येऊ लागले. या लेखांमध्ये मी गांधीजींच्या विचारांचा, त्यांच्या कर्म सिद्धांताचा परिचय करुन दिला आहे. तसेच विवेकानंदांच्या तत्वप्रणालीचा विचार करून, आर्य संस्कृतीच्या संकल्पनांचा अभ्यास इथे मांडला आहे. त्याचबरोबर लिंगभेद, गुलामगिरी, जातिभेद, श्रद्धा-अंधश्रद्धा आणि मानवी जीवन यांनाही नव्याने मांडण्याचा

प्रयत्न केला आहे. या संग्रहाचे विशेष म्हणजे शिवाजी महाराजांच्या कल्याणकारी राज्याचा, त्याचप्रमाणे स्वाभिमानी मराठा शाहिचा वेगवान आढावा यात आलेला आहे. त्यामध्ये मी सर्व पेशव्यांच्या कारकिर्दीचा विचार केला आहे. या पुस्तकाचा शेवट करताना शहाजीराजे, जिजाऊ आणि आताचे पालक हा लेख लिहिला आहे. त्यातून शिवाजी महाराजांचे जीवन दर्शन वेगळ्या पद्धतीने शब्दबद्ध झाले आहे.

म्हणून सर्वांनी हा इतिहास विषयक ललित लेखसंग्रह वाचावा. त्यातून इतिहासाची वेगळी प्रतिमा आपल्यासमोर उभी राहील. या माझ्या चिंतनातून नवीन विचार समाजात रुजवले जातील. सार्वजनिक जीवनात तसेच वैयक्तिक जीवनात माणसाने कसे वागावे, कसे वागू नये याचा आरसा म्हणजे हे पुस्तक आहे, असे मला म्हणावेसे वाटते. हे पुस्तक जास्तीतजास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी वाचावे. त्यातून त्यांना एखादा विषय कसा मांडावा याचे शिक्षण मिळू शकेल. त्यामुळे शिक्षकांनी, प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना हे पुस्तक द्यावे. साहित्य प्रतिष्ठानची सर्व पुस्तके ई-बुक स्वरूपात विनामूल्य उपलब्ध असतात. त्याचा आपण जरूर फायदा घ्यावा आणि मला अभिप्राय व्हाट्सअप वर लिहून पाठवा.

**ॲड.रुपेश पवार** (9930852165)

**इतिहास अभ्यासक**

# चिंतनातील विचार : अनुक्रमणिका


- गांधी विचार आणि भारत
- एकात्म ईश्वर आणि वारकरी संप्रदाय
- 'मध्ययुगीन गुलामगिरीचा इतिहास आणि आजचा काळ
- कर्म सिद्धांत आणि भारत
- लिंगभेद आणि मानवी जीवन
- शिवाजी महाराजांचे कल्याणकारी राज्य
- हिंदू जीवनप्रणाली आणि विवेकानंद विचार'
- जीवनविद्या एक सकारात्मक प्रवास
- 'स्वाभिमानी मराठीशाही आणि भारतीय इतिहास'
- 'शहाजीराजे, जिजाऊ आणि हल्लीचे आई वडील'

# गांधी विचार आणि भारत



१९२० साली भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा अचानक मृत्यू झाला. त्याच काळात भारतात गांधी पर्वाला सुरुवात झाली. १९१५ साली रेल्वेतून प्रवास करत असताना दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिशांनी भारतीय कृष्णवर्णी म्हणून गांधीजींचा अवमान केला. त्यावेळी गांधीजींनी त्या प्लॅटफॉर्मवर संकल्प केला ते म्हणाले, 'या ब्रिटिशांना आता त्यांची जागा दाखवायला हवी'. म्हणून त्यांनी दक्षिण

आफ्रिकेत सत्याग्रहाला सुरुवात केली. तिथूनच दक्षिण आफ्रिकेत स्वातंत्र्याच्या नव्या युगाला सुरुवात झाली. तो सत्याग्रह करून गांधीजी मायदेशात म्हणजे भारतात आले. गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आदेशावरून मोहनदास गांधी संपूर्ण भारताचा दौरा करून आले. गरीबी, बेकारी, लाचारी, धर्म, जाती, अंधश्रद्धा आणि शोषण या सर्व भारतीय परिस्थितीला जाणून गांधीजींनी एका वेगळ्या लोक क्रांतीला जन्म दिला. यात लोकांनी फक्त एकजूट होऊन जुलुमी सरकार विरुद्ध उभ रहायचं आणि आग्रहाने, निग्रहाने असंच पुढे चालत राहायचं. कायदा मोडायचा पण कायदा हातात घ्यायचा नाही. अहिंसक राहून सत्य समोर आणत, सत्याग्रह करायचा अशीही लोक क्रांती होती. कारण सामान्य लोक शस्त्रधारी क्रांती करू शकत नाहीत पण ते रस्त्यावर येऊन जनप्रक्षोभ वाढू शकतात हे गांधीजींना ठाऊक होतं.

ही लोक क्रांती त्यावेळी काही लोकांना रुचली नाही ते सर्व लोक आपल्या परीने सशस्त्र क्रांती करत गेले. म्हणून त्यावेळी भारतात क्रांतीचे विविध विचार होते, मार्ग होते. याच गोष्टीचा फायदा गांधीजींनी करून घेतला. या सत्याग्रह नीतीमुळे ब्रिटिश खरंतर भ्रमित झाले. करण इतकी मोठी लोकसेना चुकून हिंसक झाली तर आपलं काही खरं नाही.म्हणून ब्रिटिशांनी गांधीजींना फारसे सतावले नाही. ब्रिटिशांनी काही प्रमाणात

थोडेफार आढेवेढे जरुर घेतले. पण शेवटी ब्रिटिशांना गांधीजींचे म्हणणे मान्य करावेच लागले. हे असे कयम गांधी पर्वात होतं होते. असे होतं असले, तरी ब्रिटिशांनी पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव सुरुवातीला मान्य केला नाही. म्हणून गांधीजींनी अखेरचा नारा दिला. 'करेंगे या मरेंगे' असे म्हणत ब्रिटिशांना चले जाव म्हंटले. त्यावेळी भारतात सर्व बाजूंनी क्रांतीच्या मशाली पेटल्या होत्या. त्यातच जगभरात दुसरे महायुद्ध संपून मित्र देशांची आर्थिक हानी झाली होती. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता १९४२ चे शेवटचे आंदोलन यशस्वी झाले. दुर्दैवाने अति आशावादाने या भारताचे दोन तुकडे झाले. त्यामुळे आज भारताला पूर्णपणे मोकळा श्वास घेता येत नाही पण तरी हा भारत देश प्रबळ आहे. म्हणून तर स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात या भारताने सर्व क्षेत्रात प्रगती साधली आहे.

भारतातल्या सर्व क्रांत्यांचा विचार करता निर्णायक क्रांती महात्मा गांधीजींमुळे घडून आली. हे भारतीयांचे अहम भाग्य आहे. कारण सत्य, अहिंसा, जिद्द आणि गरज या बाळवर गांधीजींनी आपल्याला हे स्वातंत्र्य मिळवून. दिले. म्हणून गांधी विचार आणि भारत हा विषय मी घेतला आहे. ब्रिटिशांच्या परकीय गुलामगिरीतून भारत मुक्त झाला. स्वातंत्र्यानंतर भारताने खूप मोठी प्रगती साधून विकास घडवून आणला. तरीही भारतात आज गरीबी, बेकारी, वेटबिगारी, धर्म, जाती भेद अंधश्रद्धा, भ्रष्टाचार,

अविचार हे सर्व अनिष्ट प्रकार जैसे थे आहेत. अनेक संत, सुधारक, महात्मे या देशात होऊन गेले. तरीसुद्धा भारत आत्म मनाने स्वयंप्रकाशित झाला नाही. समानता, कायद्याचे राज्य, विज्ञाननिष्ठा याचे खरेखुरे ज्ञान भारतीय जनतेने कधीच अंगीकारले नाहीत.

म्हणून भारताला या चालू वर्तमान काळात गांधी विचारांची नितांत गरज आहे. 'माझे सत्याचे प्रयोग' हे महात्मा गांधींचे पुस्तक प्रत्येकाने आपल्या घरात, मनात, हातात ठेवले पाहिजे. कारण या पुस्तकात माणसाने कसे असावे, कसे नसावे याबाबत विस्तृत विचार मांडून ठेवलेला आहे. कोणताही माणूस आपल्या चुका झाकून ठेवतो आणि मग दुसऱ्याला ब्रह्मज्ञान शिकवतो. असं गांधीजींनी कधीच केलं नाही. त्यांच्या सत्याला कृतीदर्शी आदर्शवादी वास्तवतेची जाण होती. म्हणून या माणसाने लोक क्रांती घडवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. म्हणून गांधीजींचे सत्याचे प्रयोग आपण आचरणात आणाले पाहिजेत.

सत्य, अहिंसा, त्याग, करूणा, जिद्द आणि माणसाची गरज या सर्वांचा विचार गांधी तत्वात येतो. माणसाने जीवनात कायम सत्याने वागले पाहिजे. हे सत्य अंगी बाणवताना वास्तवतेचा यथासांग विचार करावा. म्हणजे आपले सत्य फक्त आदर्शवादी नसावे. त्याला वास्तवतेचा, सभोवतालच्या परिस्थितीचा विचार असावा. असे जर आपण वागलो तर आपण प्रगती

साधू शकतो. या भारत देशाला सार्वभौम असे लोकराज्य मिळाले आहे. राज्यघटनेने आपल्याला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य देऊ केले आहे. त्यामुळे मानवतावादी जीवन जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. तो हक्क आपण कायद्याने लढून, झगडून मिळू शकतो. त्याकरता आपल्याला सरकार, प्रशासन न्यायपालिका आणि पत्रकारितेतील अभिव्यक्तिस्वातंत्र्य दिलेले आहे. याचा उपयोग प्रत्येकाने विचारपूर्वक करावा. असे जर आपण वागलो, तर हिंसा, मारामारी, दंगेधोपे यांची वेळच येणार नाही. त्याचबरोबर प्रत्येक माणसाने समाजाचा विचार करून सलोख्याने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी त्याग हा विचार महत्त्वाचा आहे. अशाप्रकारे सामाजिक सलोख्याने जगत असताना. काही समाज घटकांविषयी आपल्या मनात करुणा उत्पन्न व्हायला हवी, तरच आपण समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत लोकराज्य म्हणजे जनतेचे राज्य पोहोचवू शकतो. त्याकरता मनात आग्रहपूर्वक, निग्रहपूर्वक जिद्द असायला हवी, तरच आपण आपले व इतरांचे कल्याण करू शकतो. हे सर्व करताना माणसाने गरज ओळखून पावले टाकायला हवीत.

गांधीजी म्हणतात आपली गरज भागवण्यासाठी निसर्गाने, आत्मशक्तीने आपल्याला खूप काही दिले आहे पण आपली हाव भागवण्यासाठी काहीच दिले नाही. म्हणजे जीवन जगण्यासाठी जे काही

आवश्यक आहे ते आपण मिळवले पाहिजे पण ज्यातून स्वार्थ, अविचार, भ्रष्टाचार, अनिती, अनैतिकता असे अवगुण तयार होत असतील, तर त्याच्या मागे लागू नये. याचा अर्थ कोणतीही हाव बाळगू नये. अशी हाव बाळगली असता माणसाचा दानव होतो. ब्रिटिशांना आपल्या प्रगतीसाठी साम्राज्य विस्ताराची, वसाहत वादाची हाव होती. ती त्यांची हाव पूर्ण झाली नाही. त्याही आधी मोगलशाहीने धर्माचा व साम्राज्याचा विस्तार करायचा म्हणून हाव धरली. त्यांचा हा स्वार्थ निसर्ग देवतेने हाणून पाडला आणि ते जगाच्या नकाशावर दानव ठरले. म्हणून मानवता टिकवण्यासाठी आपल्याला महात्मा गांधीजींचे 'सत्याचे प्रयोग' आत्मसात केले पाहिजेत, तरच माणसाचे कल्याण होऊ शकते अन्यथा माणसाचा विनाश अटळ आहे.

म्हणून प्रत्येक माणसाने महात्मा गांधीजींचे विचार मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात, बंदिस्त ग्रंथालयात ठेवू नयेत, तर ते कृतीत आणून सत्यात उतरवावेत. त्यावेळी हे महात्मा गांधीजींचे विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोचू शकतील तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने शाश्वत गांधी विचारांचा होईल. गांधी विचार हे एक तत्व आहे. माणूस, आत्मा, परमात्मा अनंतात विलिन होऊन जातात पण त्यातल तत्व हे अमर राहतं. म्हणून गांधीजींचे विचार आजही लोककल्याणासाठी महत्त्वाचे आहेत.

# एकात्म ईश्वर आणि वारकरी संप्रदाय



प्राचीन हिंदू धर्मापासून बौद्ध व जैन धर्म उदयाला आले. त्यांनी हिंदू धर्मातील काही तत्वांना नव्याने लोकांसमोर आणले. त्या विचारांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. कालांतराने या दोन धर्मांना हिंदूचेच पंथ-घटक मानले गेले.

हिंदू धर्माप्रमाणे हे दोन धर्मही गुण्यागोविंदाने नांदू लागले. त्यामुळे भारतात समाधानकारक अध्यात्माचे वातावरण तयार होत होते परंतु हिंदू

धर्माच्या सनातनी, कर्मठ समजुतींमुळे भारतीय समाज कर्मकांडात, जतीय भेदात अडकून पडला होता. या जाचातून संपुर्ण भारतीय बहुजन समाज अक्षरशः पिचला गेला होता. ही अविचारांची धर्मिक जळमट बाहेर काढून हिंदू धर्माला बौद्ध व जैन धर्मप्रमाणे पुनर्जीवित करायचे होते. तसा प्रयत्न त्या काळात अनेकांनी केला.

पण बाराव्या शतकात आपल्या हिंदू धर्मात नवधार्मिक क्रांतीची सुरुवात झाली. भारतात भक्तिसंप्रदायाचे नवे पर्व सुरू झाले. याच काळात भारतावर परकीय आक्रमणे झाली. परकीय सत्ता हळूहळू पाय पसरू लागली. त्यांची धर्म संस्कृती वेगळी होती. त्यांना त्यांच्या धर्माचा प्रसार करून, जगावर त्यांच्या धर्माचे राज्य प्रस्थापित करायचे होते. त्यामुळे त्यांनी भारतीय जनतेचे अतोनात हाल केले. या लोकांचे धर्म परिवर्तन करून त्यांच्या धर्माचे गुलाम बनवले. असे पर धर्मचक्र फिरत असताना दुसरीकडे भक्तिसंप्रदायाने आपले पाय मजबूत केले. भारताच्या उत्तर, दक्षिण भागात अनेक संत होऊन गेले. त्यांनी भक्तिसंप्रदायाचा प्रकार सुरू ठेवला. भगवंत एकच आहे, त्याचे नाम घेत जीवनात चालत रहा. त्याकरता यज्ञयाग, कर्मकांड करू नका, सर्व ठिकाणी एकात्म ईश्वर आहे. त्यामुळे हरिभजनात तल्लीन व्हा, त्यातून तुम्हाला जीवनाचा खरा मार्ग सापडेल. त्याकरता तुम्ही फक्त मुखाने भगवंताचे नामस्मरण करा. त्यातून तुमचे जीवन सफल होईल.

या भक्तिसंप्रदायाचा प्रभाव महाराष्ट्रात जास्त होता. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई आणि नामदेव यांनी महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाला नवे वळण दिले. त्यामुळे महाराष्ट्रात या भक्तिसंप्रदायाला भागवत संप्रदाय, वारकरी संप्रदाय म्हणून ओळखले जाऊ लागले. हळूहळू या संप्रदायाने अखिल महाराष्ट्राला वेड लावले. त्यातून एकेश्वर वादाचा नामजप सुरू झाला. आपण सर्वांनी कुठल्याही देवाला पूजले, तरी भगवंत एकच असून तो सगळीकडे सारखाच आहे. या अखिल विश्वात तो सामावलेला आहे. त्यास आपण भजावे, त्याचे नामस्मरण करावे. कर्मठ धार्मिक परंपरांचे पालन आपण कधी करू नये. अंधविश्वास, अंधश्रद्धेला मनातून काढून टाकावे. हा या वारकरी संप्रदायाचा विचार होता. वारकरी संप्रदाय हा पूर्णतः "भगवत गीतेवर" आधारलेला आहे. या ग्रंथातील १८ अध्याय मानवी मनाला संस्कारित करतात परंतु उच्च धार्मिक मंडळींनी संस्कृत भाषेतील या ज्ञानाला लोकांपर्यंत व्यवस्थित पोहोचवले नाही. म्हणजे या उपयोगी संस्कारित ग्रंथाला त्यावेळच्या लोकभाषेत आणले नाही. कारण धर्माच्या नावाखाली त्या उच्च धार्मिक मंडळींना, बहुजन समाजाचे शोषण करायचे होते. याकरता त्यांनी वर्षानुवर्षे हे प्रयत्न चालू ठेवले होते. ही नीती वारकरी संप्रदायाने पुरेपूर ओळखली व कोणताही अट्टाहास न करता समंजसपणे

लोकांना खरे ब्रह्मज्ञान पटवून दिले. त्याकरता त्यांनी लोक भाषेचा आधार घेतला.

म्हणून या वारकरी संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. या वारकरी संप्रदायाच श्रद्धा स्थान पंढरपुरातील विठ्ठल हे होतं. या देवाच्या दर्शनाला जाण्याकरता वारी हा पर्याय वारकरी संप्रदायाने निवडला पण या वारीत सामील होण्याकरता एकच अट होती. कोणताही भेद न करता संगती, संगतीने टाळ, मृदुंग वाजवत, नाचत त्या विठुरायाच्या दर्शनाला जायचं आणि शिस्तबद्धतेने हा सोहळा पूर्ण करायचा असा संकल्प या वारकरी संप्रदायाचा होता. हा संकल्प अजूनही पाळला जातो. काळ बदलला, राजवटी बदलल्या, माणसाच्या सुखसोयीत बदल झाला. तरीदेखील आज आषाढीला प्रत्येक वारकरी पंढरपूरला जाण्यासाठी उत्सुक असतो. त्यामुळे वारकरी संप्रदायाला महाराष्ट्राची संस्कृती असे म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराजांनाही याच वारकरी संप्रदायाने सहकार्य केले. अनेक सदभावी मावळे शिवशाहीला भेटले, म्हणूनच हा महाराष्ट्र घडला. अशा या वारकरी संप्रदायामुळे आपल्या महाराष्ट्रात कीर्तन करायची परंपरा निर्माण झाली. यामुळे आज गावा गावात भागवत हरिनाम सप्ताह संपन्न होतात. त्यातून लोकमनावर सदभावक संस्कार केले जातात. अंधश्रद्धा, अंधविश्वास, अविचार, व्यसनाधीनता यांच्यावर मार्मिक शब्दात प्रहार केले जातात

आणि अध्यात्मिक विचारातून लोकांना सहज मानवतावादी तत्वज्ञान पटवून दिले जाते. याकरता संतशिरोमणी ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव या इतर सर्व संतांचे अभंग भावार्थातून गायले जातात. त्यात गवळण, अभंग, भारुड, ओवी आणि जागर असे काव्यप्रकार प्रामुख्याने घेतले जातात.

वारकरी संप्रदायाच्या या सर्व अध्यात्मिक विचारांमुळे हिंदू धर्म संस्कृती टिकून आहे जेव्हा देशात परकीय आक्रमणाचा धुमाकूळ सुरू होता तेव्हा महाराष्ट्रात वारीची परंपरा मोठ्या प्रमाणात सुरू होती. या परंपरेने अध्यात्मिक चळवळीचे रूप घेतले होते. जातीधर्मांच्या भिंती तोडून समाजात मानवतेचा विचार या संप्रदायाने रुजवला. वारकरी संप्रदायाच्या संत नामदेव महाराजांनी या भागवत धर्माची पतका पंजाबपर्यं◌ंत पोचवली. म्हणून शिखांच्या धर्म ग्रंथात नमदेव महाराजांचे दोहे वाचावयास मिळतात. अशाप्रकारे भारताच्या इतिहासात वारकरी संप्रदायाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. कारण वारकरी संप्रदायाने हिंदू धर्म नुसता टिकवला नाही, तर त्यातील मानवतेचा संदेश खऱ्या आर्थाने प्रसारित केला. हा वारकरी संप्रदायाबाबतचा माझ्या मनातील विचार आपल्यापर्यंत पोचवावा याकरता 'एकात्म ईश्वर आणि वारकरी संप्रदाय' हा विषय मी घेतला आहे.

# 'मध्ययुगीन गुलामगिरीचा इतिहास आणि आजचा काळ'



जगभरात जेव्हा व्यापाराकरिता, संपत्तीकरता, धर्मप्रसारकरता सामराज्य विस्तार होऊ लागला तेव्हा वसाहतवादाला प्रारंभ झाला. जगभरातील काही राज्यकर्ते, सम्राट, कंपन्यांन्या वेगवेगळ्या प्रदेशात गेल्या. तिथे असलेल्या राजसत्तेला किंवा लोकसमुदायाला त्यांनी पराभूत केले. मग या प्रदेशांमध्ये त्यांनी आपली वसाहत निर्माण केली. तिथे राहणाऱ्या आमजनतेला त्यांनी गुलाम केले. अशा गुलामांचा व्यापारही त्यांनी सुरू केला.

त्या ऐतिहासिक प्राचीन काळात तीन प्रकाराने गुलाम तयार केले जात होते. त्यात सर्वप्रथम एखाद्या परदेशी राजवटीचा सम्राट दुसऱ्या राजवटीवर आक्रमण करायचा. या युद्धात तो सम्राट अजिंक्य झाला, तर तो त्या पराजित सैनिकांना गुलाम करायचा. त्यावेळी तो त्या सर्व सैनिकांना ठार करून, त्यांच्या बायका पोरांना गुलाम बनवत असे. त्यांना तो परदेशी सम्राट गुरा-ढोरा प्रमाणे वागवत असे. अशाप्रकारे पिढीजात गुलाम तयार होत गेले. त्याचप्रमाणे काही देशात गुलामांची खरेदी-विक्री चालत होती. काही देश यात अग्रेसर होते. त्यांच्या देशात माल विक्रीच्या बाजारात सरास गुलामांची विक्री होत होती. जनावर असल्याप्रमाणे माणसांची विक्री या बाजारात चालत होती. त्याचबरोबर या बाजारात स्त्रियांचीही विक्री होत होती. या गुलाम स्त्री, पुरुषांना नंबर टॅग लावून त्यांच्या शरीराचे वस्त्र विरहित प्रदर्शन लोकांसमोर केले जात होते. असा व्यापारी बाजार काही युरोपियन देशात आणि अरबस्थानात चालू होता. त्याच पद्धतीने काही समाजात पारंपरिक गुलामगिरी प्रथा सुरू होत्या. या प्रथेनुसार एखादी व्यक्ती जर कर्जबाजारी झाली, तर ती आर्थिक बाबतीत कमजोर ठरायची. अशावेळी संबंधित जमीनदार, सावकार त्या व्यक्तीची मालमत्ता हस्तगत करून त्याला विनामोबदला राबवून घेत असे. यातून वेटबिगार, मजूर कुळांची गुलामगिरी सर्व देशात सुरू होती.

प्राचीन इतिहासात किंवा मध्ययुगीन इतिहासात यंत्र तंत्रांचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे मनुष्यबळाचा उपयोग करूनच उद्योग, व्यवसाय चालवावा लागत होता. त्यामुळे खाणकाम उद्योग, शेती उद्योग, साखर उद्योग व अशा प्रकारचे बरेच उद्योग त्या काळात सुरू होते. या उद्योगात काम करण्यासाठी अनेक मजूर गुलाम लागत होते. अशा या मजूर गुलामांना कोणत्याही प्रकारचे वेतन दिले जात नव्हते. त्यांना एकदा विकत घेतल्यावर गुरा ढोराप्रमाणे वागले जात होते. त्यांना प्रत्येक दिवशी जेवणाचा खुराक देवन, दिवस-रात्र कामाला झुंपले जात होते. मालक म्हणेल तितका वेळ काम करावे लागत होते. त्या ठिकाणी आराम, दिरंगाई, चूक या गोष्टीना जागा नव्हती, क्षमा नव्हती. असे कृत्य

एखाद्या गुलामाकडून झाले, तर त्याला चाबूकाने मारले जात होते. किंवा इतर प्रकारचे शोषण केले जात होते. हे काम करण्याकरता काही गुलाम निकामी ठरले, तर त्यांना ठार केले जात होते. अशाप्रकारे ही गुलामगिरी प्रथा प्राचीन, मध्ययुगीन इतिहासात तयार केली गेली. त्यावर कोणताही कायदेशीर वचक नव्हता.

जगभरात अशी अन्यायकारक गुलामगिरी सुरू असताना, भारतात मात्र मानवता जपली जात होती. आर्यांनी आपल्या समाज जीवन पद्धतीत गुलामगिरी प्रथा आणली नव्हती. मौर्य साम्राज्यात गुलामांना विकणे किंवा

विकत घेणे यावर कायमस्वरूपी निर्बंध होते. सोळाव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य उभारले ते स्वराज्य गुलामगिरी प्रथे विरुद्ध होते. लोकांना गुलामगिरी मुक्त आयुष्य जगता यावे, याकरता हा स्वराज्य यज्ञ त्यांनी केला होता. त्यांनीही गुलामांच्या विक्रीवर पूर्णपणे निर्बंध आणले. परधर्मीय लोकांनाही शिवाजी महाराजांनी माणसासारखी वागणूक दिली. म्हणून शिवशाहीत गुलामगिरी प्रथेला कायमचा आळा बसला. गुलामगिरी प्रथेबाबत आपण जर महाभारताचा संदर्भ घेतला, तर आपल्याला कळून येईल. कौरवांनी एका साध्या खेळात कुटील डाव रचून पांडवांना फसवून पराजित केले. त्यातून त्यांनी पांडवांना दास किंवा गुलाम केले. त्यावेळी द्वारकाधीश कृष्णाने पांडवांना सहकार्य केले. कौरवांच्या अधर्माविरुद्ध धर्माचा लढा उभारला. त्यातून या कृष्णाने पांडवांना विजयश्री मिळवून दिली. ते ही महाभारत युद्ध गुलामगिरी विरोधात होते. आपल्या भारतात पुरातन काळात राजदरबारी अनेक नोकरचाकर असायचे. त्यांना आपण दास, दाशी म्हणायचो परंतु हे दास किंवा दाशी कोणत्याही राजवटीचे गुलाम नसायचे. त्यांना माणूस म्हणून वागवले जायचे. त्यांचा मान सन्मान होत होता. आपल्या अध्यात्मशास्त्रात सेवा देणाऱ्या लोकांना देव समजले जाते. ही अशी सुंदर मानवतावादी संकल्पना भारताने जगाला दाखवली आहे.

परंतु मध्ययुगीन कालखंडात गुलामगिरी प्रथा वाढत गेली. निग्रो लोकांना अमेरिकेने गुलाम केले. मुघल राजवटीने भारतातील जनतेला गुलाम केले. परंतु जगभरातील अनेक देशांप्रमाणे भारतात त्या काळातही मोठ्या प्रमाणात गुलामगिरी नव्हती. कारण त्याकाळी शिवाजी महाराजांसारखे राजे भारताच्या कोणत्या ना कोणत्या प्रांतात होते. त्यात राजपूत, शिख, मराठे या प्रथे विरोधात होते, तरी सुद्धा भारताच्या काही भूभागात वेटबिकारी, पारंपारिक कुळाचार आणि जातीय गुलामगिरी पाय रोवून उभी होती पण या प्रकारच्या गुलामगिरीत मानवाची विक्री नव्हती. भारतात ब्रिटिश काळात शेतीवर आधारित नगदी उद्योग सुरू झाले तेव्हा आधुनिक कामगार, मधुर तयार होऊ लागले. त्यांना जास्तीत जास्त श्रम केल्यावर मोबदला कमी रकमेचा मिळत होता. तो त्या श्रमाच्या प्रमाणात नव्हता. म्हणून १९२०च्या कालखंडात महात्मा गांधींनी नीळ कामगारांच्या शोषणावर सत्याग्रह सुरू केला. अशा प्रकारचे वेगवेगळे मजूर सत्याग्रह गांधीजींनी सुरू ठेवले. त्यात मिठाचा ही सत्याग्रह येता. याचा अर्थ असा आहे. भारतात सर्व राज्यकर्त्यांनी, नेत्यांनी, समाजसुधारकांनी गुलामगिरी प्रथेला विरोधच केला. महात्मा ज्योतिराव फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीय गुलामगिरीविरुद्ध मोठा लढा दिला आणि जातीय गुलामगिरी

मोडून काढली. त्यातून बहुजनांना मानवी न्याय हक्क मिळवून दिला. या सर्व प्रयत्नांमुळे भारतात समाजवादाला प्रारंभ झाला.

त्यातून स्वतंत्र भारतात कामगार विषयक कायदे निर्माण झाले. कामगारांना कायदेशीर अधिकार मिळाले. त्यासाठी कामगार नेत्यांनी मोठ्या प्रमाणात कार्य केले पण भांडवलवादी आर्थिक सत्तेने होत्याचे नव्हते करुन, कामगारांचे संप घडवून आणले आणि चालू कारखाने दिवाळखोरीच्या नावाखाली बंद पाडले. कारण त्यांना आधुनिक यंत्रांचा वापर करून कमीत कमी कामगारात किंवा कामगार विरहित भांडवली नफा कमवायचा होता. या अशा त्यांच्या बनावटी प्रयत्नांमुळे आज कामगार कायद्याची वाताहत झाली आहे. त्यातच हळूहळू आपल्या भारतात खाजगी करणाने जोर धरला आहे. आपल्या क्षमतेप्रमाणे, वयाप्रमाणे काम कारा जेव्हा काम करणे शक्य नसेल तेव्हा घरी बसा. असं हे आधुनिक कामगारांचं जीन आहे. ते जनतेने मान्य केले आहे. ही खेदाची गोष्ट आहे. त्यातच शासनाने पेन्शन योजना बंद केल्या आहेत. खाजगी इन्शुरन्स कंपन्यांना आपला व्यवसाय करता यावा. हा हेतू सरकारला मान्य आहे पण यात जनतेच्या पैशांची शाश्वती सरकार घेत नाही. म्हणजे इथे 'लहरी राजा प्रजा आंधळी' असा कारभार चालू झाला आहे. या सर्व गोष्टींचा राजकीय पक्षांनी, समाजसेवी संस्थांनी व भारतीय म्हणून प्रत्येक जनमानसाने याचा

विचार केलाच पाहिजे. कारण आपल्या देशात जन्मलेल्या प्रत्येक माणसला मरेपर्यंत चांगले जीवन जगता आले पाहिजे. हा प्रजासत्ताक लोकशाहीचा पहिला अधिकार आहे. आज लोकसभेत विधानसभेत असणाऱ्या प्रत्येक आमदार, खासदारांना अजीवन पेन्शन मिळते. मग ती कार्यालयीन आमजनतेला का मिळत नाही. याचा विचार आता सर्वांनी केला पाहिजे. ही एक स्वतंत्र भारताची अघोषित गुलामगिरी आहे. या आधुनिक अघोषित गुलामगिरीला आपल्यासारख्या सामान्य माणसानीच समाप्त केले पाहिजे. कारण भारतात कोणत्याही प्रकारच्या गुलामगिरीला कधीही थारा दिला जात नव्हता. त्यामुळे आपण आजही जातीय गुलामगिरीविरुद्धात लडतो आहोत. त्यातून बहुजन समाजाला आपण त्यांच्या न्याय हक्काचा अधीकार दिला आहे. त्याकरता आपल्या देशाचे न्यायिक कायदे प्रबळ केले आहेत. याचपद्धतीने आपण कामगारांचा, कर्मचाऱ्यांचा विचार करावा. म्हणून मी 'मध्ययुगीन गुलामगिरीचा इतिहास आणि आजचा काळ' हा विषय घेतला आहे. या विचारातून आपण नेमके काय घ्यायचे, हे आपणच ठरवाचे. म्हणून या विषयाचा बारकाईने विचार करावा.

# कर्म सिद्धांत आणि भारत



भगवतगीता हा ग्रंथ पूर्णतः कर्म सिद्धांतावर आधारित आहे, असे म्हंटले जाते. म्हणून लोकमान्य टिळकांनी खास करुन गीतारहस्य हा ग्रंथ रचला. तो ग्रंथ पूर्णपणे कर्मयोगावर म्हणजे कर्म सिद्धांतावर आधारलेला आहे. त्यावर अनेक व्याख्याते व्याख्यान देत असतात. अशाच प्रकारचा

एक वेगळा कर्म सिद्धांत (म्हणजे कर्मयोग) महात्मा गांधींनी आपणास पटवून दिला होता. त्या कर्म सिद्धांतावर कोणीच अजून फारसा विचार केलेला नाही, असे मला जाणवते. म्हणून हा विषय सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. भगवतगीतेप्रमाणे तो आपल्याला समजून घ्यायचा आहे.

प्रत्येक माणूस जीवन जगण्याकरता, जीवनमान उंचावण्याकरता काहीना काही उद्योग, व्यवसाय, नोकरी करत असतो. त्या कार्याच्या बदल्यात त्याला ठराविक मोबदला मिळत असतो. त्यातून प्रत्येक माणूस आपल्या खिशात येणारा पैसा खर्च करत असतो. आजच्या जगण्याकरता किंवा उद्याच्या भविष्यकाळाकरता तो काहीना काही गुंतवणूक करत असतो. ही गुंतवणूक जागेच्या स्वरूपात, वस्तूच्या स्वरूपात, शेअरच्या स्वरूपात आणि जमिनीच्या स्वरूपात असते. या सर्व प्रकारच्या व्यवहारात माणूस काय करतो, तर तो आपल्याकडे असलेला पैसा इतर व्यक्तींना देत असतो. त्या मोबदल्यात तो वरील सर्व गोष्टी मिळवतो. याचा अर्थ माणसाकडे आलेला पैसा त्याच्याकडे पूर्णकाळ, पूर्णवेळ राहत नाही. तो पैसा बँक बॅलन्समधून पाठवला गेला, तरी तो पैसा खर्च झाल्याशिवाय राहत नाही. असा हा पैसा सातत्याने वाहत असतो.

वाहणारा हा पैसा प्रामुख्याने तीन पद्धतीने समाज जीनात जात असतो. त्यात माणसाचा दैनंदिन व भविष्यकालीन खर्च, शासनाने आकारलेले कर

आणि व्यक्तिगत, सार्वजनिक जीवन जगत असताना माणसाने केलेला दानधर्म यासर्वातून माणसाजवळ असलेला पैसा खर्च होतं असतो. म्हणून आपल्या हिंदू धर्मशास्त्रात म्हणतात. लक्ष्मी ही चंचल आहे ती एका जागेवर थांबत नाही. या न थांबणाऱ्या चंचल पैशातूनच या व्यवहारी कर्म सिद्धांताला सुरुवात होते. या कर्म सिद्धांतातूनच समाजाचा, राष्ट्राचा, जगाचा विकास होत असतो. म्हणून या कर्म सिद्धांताबाबत गांधीजी म्हणतात. 'माणसाला जाणीवपूर्वक समाजकार्य करायची काहीच गरज नाही. माणूस आपले जीवन जगण्यासाठी जे नित्याचे काम करतो. त्यातूच तो सामाजिक विकासाला हातभार लावतो. म्हणून माणसाने कोणतेही काम करताना प्रामाणिक राहून यथाशक्ती आपले काम करावे. असे महात्मा गांधींचे सरळ मत होते आणि ते मत व्यवहारिक कर्म सिद्धांताला धरून होते.

या कर्म सिद्धांताबाबतीत आपण जर भारतीय संस्कृतीचा पुर्णतः अभ्यास केला, तर असे जाणते. ही भारतीय संस्कृती कृषीप्रधान अर्थव्यवस्थेवर मजबूत रित्या उभी होती. त्यामुळे भारतातील ग्रामीण जीवन त्याकाळी स्वयमपूर्ण होते. ही स्वयमपूर्ण नावाची सुबत्ता येण्याकरता भारतातील समाज जीवनात व्यवसायीक समुह घटकाची एक रचना अस्तित्वात होती. यामध्ये सुतार, लोहार चांभार, कुभर इत्यादी अनेक कारागीर असायचे. हे सर्व लोक गावातील शेतकऱ्यांना अवजारे पूर्वत. त्या

अवजारांच्या मोबदल्यात त्या व्यवसायीक समाज घटकाना अन्नधान्य व पशुधन मिळायचे. त्यामुळे गावातल्या गावात प्रत्येक माणूस समाधान कारक जीवन जगायचा. हे स्वयंमपूर्ण समाधान त्यावेळच्या सामाजिक जीवनातील कर्म सिद्धांतावर आधारलेले होते. हा कर्म सिद्धांत आर्यकाळा आधीही भारतात अस्तित्वात होता.

परंतु काळाच्या ओघात या व्यवसायीक समुह घटकांना हळूहळू जातीय स्वरुप दिले गेले. त्यातून चार वर्णांची उतरण निर्माण झाली. त्या काळातील उच्चवर्णीय लोकांनी बहुजनांवर सत्ता प्रस्थापित करण्याकरता हे जातीय समीकरण जुळवून आणले.

यात त्यांनी सांगितले ब्रह्मदेवाच्या पायातून शुद्र आले, पोटातून वैश्य आले, हातातून क्षत्रिय आले आणि तोंडातून ब्राह्मण आले. असे सांगत या उच्चवर्णीय लोकांनी भोळ्याभाबड्या आमजनतेला धर्माच्या नावाखाली भ्रमित केले. खरे पाहता ही अखिल सृष्टी मातीच्या कणातून आणि जननातून उत्पन्न झाली आहे. लोक कल्याणाकरता देवांनाही मनुष्य जन्म घ्यावा लागला. म्हणजे बहुजनांना धार्मिकबाबतीत गुलामगिरीच्या जोखाडात अडकवून आपले जीवन कार्य सुरळीत चालण्याकरता हा जातीय भेद उच्चवर्णीयांनी निर्माण केला. या सर्व गोष्टींची चर्चा महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या 'गुलामगिरी' पुस्तकात इत्थंभूत मांडली आहे.

याचा अर्थ मूठभर धार्मिक खोट्या प्रवृत्तीच्या उच्चवर्णीय लोकांनी. समाजावर आपला कायमस्वरूपी वचक बसवण्याकरता या जातीय वादाला वाढवले. त्यातून समाजात सुरळीतपणे चाललेला. व्यवसायिक समूह घटकांचापारंपरिक उद्योग जातीच्या नावाने त्यांनी पायदळी तुडवला. या सगळ्यातून वर मांडलेला लोक कल्याणाचा कर्म सिद्धांत मोडून पडला पण आजच्या आधुनिक जगात समानतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणताही माणूस कुठल्याही प्रकारचा व्यवसाय, धंदा, उद्योग करू शकतो. फक्त त्यात प्रामाणिकपणा असायला हवा. आपण जे काही काम करतो. त्या कामातून समाजाच भलं झाल पाहिजे. याच विचारातून समाजाची, राष्ट्राची, विश्वाची भरभराट झाली पाहिजे. म्हणून हा कर्म सिद्धांत महत्त्वाचा वाटतो. हा कर्म सिद्धांत गांधीजींच्या तत्त्वप्रणालीत होता. तो मी प्रकाशात आणला आहे.

# लिंगभेद आणि मानवी जीवन (चिंतनातील विचार)



या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात सृष्टी निर्माण होत असताना. निसर्ग देवतेने दोन घटक प्रामुख्याने निर्माण केले. हे दोन घटक प्रत्येक पशू पक्षात, मनुष्यमात्रात आपल्याला दिसतात. या दोन घटकांशिवाय आपण सर्वजण या सृष्टीची कल्पना करू शकत नाही. हे दोन घटक म्हणजे नर आणि मादी.

या दोघांच्या मिलनातूनच पृथ्वीवर पुनरुत जीवन उदयाला येते. इतके हे घटक परस्परांना पूरक आहेत. त्यामुळे सर्व पशू पक्षात, मनुष्यमात्रात भूक, निद्रा, भय आणि मैथून या चार नैसर्गिक शरीरधर्म प्रकिया प्रत्येक जीवात आढळतात. पशु पक्षांमध्ये केवळ याच प्रक्रिया अजूनही चालू आहेत. यात माणूस मात्र आपलं वेगळेपण टिकवून आहे. कारण माणसाला विवेक नावाची पाचवी प्रक्रिया निसर्गाने देऊ केली आहे. सुरुवातीच्या काळात मात्र मानव जातीला या विवेक प्रक्रियेची जाणीव झाली नव्हती. त्यावेळी माणूस पशुपक्ष्यांप्रमाणेच आपले जीवन जगत होता.

हे पशूंचे जीवन जगत असताना तो जंगलातील घूवेमध्ये राहत होता. त्यावेळी तो लिंगाच्या बाबतीत कोणताही भेद करत नसे. या काळात तो नर, मादी या नैसर्गिक नात्यात परस्पर पूरक राहून, एकमेकांसोबत जंगलातील जीवन सामोपचाराने जगत होता. फक्त त्यात नैसर्गिक देह रचनेचा फरक होता. बाकी तो लिंगभेद असा करत नव्हता. लैंगिक जवळीक, स्वसंरक्षण आणि पोटाच्या भुकेसाठी भक्षक इतक्याच मापक गरजा माणूस नावाच्या नर मादी च्या होत्या. पुढे जाऊन हा माणूस समूह बनवून राहू लागला. शिकारी पासून शेतीपर्यंत त्याचा प्रवास झाला. शेतीच्या काळात मात्र माणूस घर, जमीन घेऊन कुटुंबासहित स्थिरतेचे जीवन जगू लागला. असे जीवन जगत असताना, माणूस हळूहळू

समाजशील होऊ लागला. त्यातून समाजातील अलिखित नियम तयार होऊ लागले.
या सर्वातून रूढी, परंपरा, संस्कृती निर्माण होऊ लागली. समाजातील स्त्री-पुरुष या नियमाने जीवन जगू लागले.

भौगोलिक प्रदेशानुसार प्रत्येक समाज समूहात वेगवेगळ्या सांस्कृतिक परंपरा निर्माण झाल्या. या समाज संस्कृतीत काळानुसार हळूहळू स्त्री-पुरुष समानता नष्ट होऊ लागली. त्यावेळी स्त्रीला पुरुषांनी शरीर रचनेच्या दृष्टीने कमजोर समजून रुढींच्या साखळीत अडकवले. तिथून पुढे जगभरातील स्त्रियांवर अन्याय, अत्याचार होऊ लागले. स्त्रीच्या शारीरिक पूनरुत जीवन प्रक्रियेला म्हणजे गर्भारपण रचनेच्या व्यवस्थेला, समाजातील पुरुषांनी आपल्या भोगाचे साधन बनवले. त्यातून बहुपत्नीत्व, जनाना अशा संकल्पना निर्माण झाल्या. या संकल्पनेनुसार एक पुरुष अनेक स्त्रियांना उपभोगू लागला. हे समीकरण पिढीजात असेच सुरू राहिले. या भोगवादी प्रवृत्तीतून सजात पुढे वेश्या व्यवसाय, गुलाम स्त्रियांचा बाजार सुरू झाला. या सर्व चुकीच्या भोगी वृत्तीमुळे स्त्रीयांवर जनावरासारखे अत्याचार होऊ लागले. यातून स्त्री सुद्धा पुरुषांची संपत्ती होऊन बसली. अशा प्रकारच्या अविचारातून जगातील सर्व स्त्रिया पिचल्या गेल्या. त्यांना माणूस म्हणून

जगण्याचा अधिकार समाजाने दिलाच नाही. सगळीकडे पुरुषांचे राज्य प्रस्तापित झाले.

मध्ययुगीन इतिहासाच्या काळात अनेक राजवटींनी वेगवेगळ्या प्रांतावर, प्रदेशांवर, देशांवर आक्रमणातून आपल्या राजवटीचा विस्तार केला. असे राज्य हस्तगत करताना, प्रत्येक सम्राटाने त्या प्रदेशातील जनतेवर अतोनात अत्याचार केले. त्यावेळी त्या शासकांनी हाती आलेल्या शत्रूंच्या स्त्रियांवर आपला मालकीहक्क समजून त्यांचे शारीरिक शोषण केले. अशा प्रकारच्या बळजबरीमुळे लाखो, करोडो स्त्रिया माणूसपण गमावून बसल्या. त्यांना मान-सन्मानाने जगण्याकरता त्याकाळच्या जगात कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले नव्हते. हा सर्व अन्याय, अत्याचार समाजाच्या नसानसात भिनला होता. मग स्त्रियांवर अनेक प्रकाराने अन्याय, अत्याचार सुरू झाले. अब्रू, इज्जत, शिलभंग या नव्या शब्दांखाली स्त्री वर्गाला समाजाने अगदी गांजून ठेवले. दागिन्यांची, पैशांची लुट व्हावी. त्याप्रमाणे स्त्रियांच्या इज्जतीची लूट झाली, असे शब्द प्रयोग समाजात पुढे रूढ झाले. त्यामुळे स्त्रियांचे जीवनमान खालावत गेले. काही प्रदेशांमध्ये स्त्रियांना शिक्षणातील संधी दिली गेली नव्हती. अशा परिस्थितीत स्त्री ही पडद्याआड राहिली. अशी अवस्था स्त्री शक्तीची होती.


या अवस्थेमुळे स्त्रियांचा दुय्यम दर्जा झाला. शोषित, वंचित घटक म्हणून त्या मोजल्या गेल्या. यातूनच नवजात मुलींना ठार मारणे किंवा मुलींचा बालविवाह करणे, तिचे शारीरिक पोषण व्यवस्थित न करणे, तिला जनावरासारखे कामाला जुंपणे, एखाद्या यंत्राप्रमाणे मुलीचे लैंगिक शोषण करून, कमी वयात अपत्य जन्माला घालने. या सर्वातून स्त्रियांची शारीरिक क्षमता कमजोर करून टाकने. ती क्षमता कमजोर झाल्यावर बाई नाजूक आहे या सदराखाली तिचा मानसिक सामाजिक छळ करणे. म्हणजे महिलांना मानसिक दृष्ट्या स्टारगेट करणे. या सर्व गोष्टी समाजात कायम सुरू होत्या. त्यामुळे स्त्रियांची मानसिकता हळूहळू दुबळी होत गेली. चूल, मुल, चार भिंती आणि पती इतकेच विश्व बाईचे झाले. या मानसिकतेतून स्त्रीला बाहेर येता आले नाही. समाजाने तिला बाहेर येऊच दिले नाही.

एवढेच नव्हे तर पुनरुत जीवन घडवणाऱ्या, प्रतिशरीर निर्माण करणाऱ्या, मासिक पाळी नामक स्त्री शरीर धर्माच्या प्रक्रियेलाही पुरुष सत्ताक व्यवस्थेने अशुद्ध मानले. त्यावेळी पुरूषसत्ताक व्यवस्थेने हे जणले नाही. आपल्याला वंश मिळण्याकराता याच प्रक्रियेतून संभोग करावा लागतो तेव्हा पुरुषाचे शरीर अशुद्ध होत नाही का? याचा विचार समाजातील पुरुषांकडून त्यावेळी झालेला नव्हता. खरं तर नवजात बाळ सुद्धा या प्रक्रियेतून कमळासारखे बाहेर येते. तरी स्त्रीला समाजातील पुरुषांनी

जननग्रंथीबाबत अशुद्ध मानाले. आजच्या काळात काही युरोपियन, आफ्रिकन आणि आशियातील राष्ट्रांमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे. या देशांमध्ये स्त्री-पुरुष समानता आलेली आहे. तरीदेखील काही देशांमध्ये स्त्री-पुरुष समानता असूनही दिसत नाही. स्त्री शरीरधर्माच्या बाबतीत किंवा अन्य गोष्टींच्या बाबतीत लिंग भेद हा केला जातो.

मानवी इतिहासाची पाने इतकी पलटून गेली, तरी हा वैश्विक समाज अजून त्याच जुन्या काळात चाचपडतोय. हे पाहून जगाच्या इतिहासातील समाजसुधारकांचे आत्मे किती तळमळत असेल. यांची गणती करायलाच नको असे खेदाने म्हणावेसे वाटते. म्हणून 'लिंगभेद आणि मानवी जीवन' हा विषय मी घेतला आहे. यातून लिंगभेदाचा प्रश्न किती खोलवर रुजलेला आहे. हे माणसाला समजून घेता येईल. याकरता हा विषय महत्त्वाचा आहे.

# शिवाजी महाराजांचे कल्याणकारी राज्य'



शिवाजी महाराजांच्या जन्मा आधी हा महाराष्ट्र व्याकूळलेला होता. आपल्या धर्मावर 'जीजीया' नावाचा जुलमी कर होता. समस्त भारत भूमीवर क्षत्रिय असा कोणीच राहिला नव्हता. त्यामुळे भारतीय असलेला बलाढ्य

साम्राज्य सम्राट असा कुणी उरलाच नव्हता. यादव साम्राज्याची देवगिरी पडली होती. त्यातच विजयनगरच बलशाली दक्षिणेतील साम्राज्य नेस्तनाभूत झालं होतं. अशावेळी हा महाराष्ट्र सुद्धा साडेतीनशे वर्ष अंधारात खितपत पडला होता. कुतुबशाही, निजामशाही, आदिलशाही आणि मुगल यांसारख्या परकीय राजवटींनी या देशात धुमाकूळ माजवला होता. भारतीय जनता गुलाम होत चालली होती. आपले नरवीर क्षत्रिय परकीय राजवटीच्या चाकरीत आपले प्राण गमवत होते. सरेआम माता-भगिनींवर बलात्कार होतं होते. त्यांच्या देहाचा बाजार मांडला जात होता. शेतकऱ्यांच्या पिकांवर अंदाधुंद घोड्यांच्या टापा दौडत होत्या. पिकांची नासदूस मोठ्या प्रमाणावर होत होती. अधून मधून दुष्काळ अतिवर्षा या सर्वांच थैमान कायम होतं. त्यात खंड अजिबात पडत नव्हता.

पण एके दिवशी सह्याद्री नियतीला दया आली. शहाजी राजांचा आणि जिजाऊंचा विवाह सोहळा संपन्न झाला. या दोघांनी स्वराज्याचे एक जितेजागते स्वप्न पाहिले. शहाजी राजांनी त्यावेळी ठरवले, आपण काही काळ परकीय राजवटीमध्ये घालवावा. त्यातून स्वराज्याची मशागत करावी. स्वराज्याकरता मजबूत पार्श्वभूमी निर्माण करावी. हे विचार मनात झिरपत असताना. जिजाऊंच्या पोटी शिवबांचा गर्भ वाढत होता. जिजाऊंना स्वराज्याचे डोहाळे लागले होते. मग छत्रपती शिवाजी राजांचा

आणीबाणीच्या युद्धजन्य परिस्थितीत शिवनेरीवर जन्म झाला. सन सोळाशे ३० हे साल उजाडले. यादवांचे तेजस्वी राज्य, विजयनगरची शौर्य गाथा, रामायण महाभारताच्या कथा या सर्व संस्कारातून शिवाजी राजे मोठे होत होते. युद्ध प्रशिक्षण, संत, महात्म्यांचे विचार यामधून बाल शिवाजींच्या मनात स्वराज्याची मशागत सुरू झाली. मग सोळा वर्षाच्या किशोर शिवाजीने तोरणा गड जिंकला. द्रव्याचे हांडे हाती आले, सह्याद्रीचा आशीर्वाद लाभला. कल्याणकारी राज्याची मुहूर्तमेढ अशी रवली गेली. कलेकलेने मग हे राज्य वाढत गेले. सोळाशे ७४ साली शिवाजी राजे छत्रपती झाले. हा प्रवास वाटतो तितका सोपा नव्हता. राजांनी आपल्या रक्ताचा थेंब आणि थेंब या मातीत रुजवला. त्यातून हा महाराष्ट्रधर्म निर्माण झाला, हिंदवी स्वराज्य स्थापन झाले.

हे हिंदवी स्वराज्य स्थापन होत असताना. जिजाऊंना आणि शिवाजी महाराजांना अहोरात्र झटावे लागले. कणाकणाने बुद्धीच्या बळावर कल्पना लढवून, मुठभर मावळ्यांसह शत्रूंवर चढाई करून, त्यातून बलाढ्य राजवटींना नामोहरण करावे लागले. या सर्व लढाया गमीनी कावा या तंत्राने लढाव्या लागल्या पण या लढायांमधला विजय एका दिवसात कधीच मिळवता आला नाही. प्रत्येक वेळी कष्टाने, प्रयत्नाने, जिद्दीने आणि सबुरीने हे सर्व यशस्वी विजय शिवाजी राजांच्या हाती आले. म्हणून आज सर्वजण

म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराज हे पद वारसाहक्काने सहज शिवरायांना मिळालेले नव्हते. त्याकरता त्यांना जिवाचे रान करावे लागले. आपल्या कुटुंब, परिवारासहित शिवरायांना झोकून द्यावे लागले तेव्हा हा स्वराज्य यज्ञ सफल संपन्न झाला. कारण शिवबांना राजे म्हणून केवळ फक्त रयतेवर राज्य करायचे नव्हते, तर त्यांना रयतेचे पालकत्व घ्यायचे होते. म्हणून स्वराज्य हे देवाचे, जगदंबेचे, श्री गणेशाचे तेजस्वी राज्य होते. असे शिवाजी महाराज नेहमी म्हणायचे. या म्हणण्यातून हे स्वराज्य भव्य दिव्यातेने संस्थापित झाले.

त्याकरता शिवाजी महाराजांनी तत्कालीन जनतेच्या मनात आपलेपणाची भावना निर्माण केली. आपल्या मावळयांना शिवरायांनी सांगितले शेतकरी जनतेला त्रास होणार नाही असे आपण सर्वांनी वागावे. मोहिमेच्या वेळी आपली सेना शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून घेऊन जाऊ नका. मोहीम सुरू असताना आपल्या सेनेला लागणारे अन्नधान्य शेतकऱ्यांकडून योग्य त्या भावाने उचला. शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक द्या. अशा प्रकारच्या आज्ञा स्वराज्यात मावळयांना दिल्या होत्या. शिवाजी महाराजांनी त्या काळात भूमिहीनांना जमिनी मिळवून दिल्या होत्या. त्यावर शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. त्याकरता बी बियाणे, खतपुरवठा आणि जमीन महसूल काही दिवस नव्या शेतकऱ्यांसाठी कमी ठेवला होता.

दुष्काळी हालाखीच्या परिस्थितीत शिवाजी राजांनी आपली गोदामे शेतकऱ्यांना खुली करून दिली होती. अठरापगड जाती, जमातीच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या व्यवसायाची संधी मिळवून दिली होती. स्वराज्यला लागणारे कारखाने निर्माण केले होते. त्यात या सर्व मंडळींना त्यांनी सामावून घेतले होते. माणसाच्या कुवतीप्रमाणे, त्याच्या शक्ती, युक्तीप्रमाणे ज्याला त्याला आपली कामे वाटून दिली होती. समाजातील भटक्या जमातींना आपल्या लष्करात भरती केले होते. त्यांच्यातील लोक कलेचा उपयोग स्वराज्याकरता करून घेतला. मनोरंजनातून, प्रबोधन व प्रबोधनातून राष्ट्रनिष्ठा शिवरायांनी मनामनात जागृत केली. या त्यांच्या लोक कल्याणकारी प्रयत्नांमुळे शिवराय अल्पावधीत अतिशय लोकप्रिय झाले.

परंतु शिवाजी राजांचे हे रामराज्य प्रामुख्याने स्त्री संरक्षणासाठी होते. परकीय राजवटी आपल्या देशात आल्यानंतर वंश विस्ताराकरता, हे लोक आपल्या भारतीय स्त्रीयांना बळी पाडत असतं. त्यांचे शारिरीक शोषण करत असतं. त्यांना समाजापासून दूर करत एकाकी पाडतं असतं. मग त्यांना हे लोक आपल्या जनान्यात घेत असतं किंवा अरब देशात विकत असतं. ही स्त्रियांची विटंबना रोखण्यासाठी शिवरायांनी वेळोवेळी प्रयत्न केले. हे अत्याचार रोखण्याच्या दृष्टीने स्वराज्याच्या कायद्यातून कठोर शिक्षा

फरमावल्या. प्रत्येक स्त्रिला माता समजून त्यांचा यथोचित सन्मन केला. क्षत्रु पक्ष पराभुत झाल्यावर मावळे त्यांच्या सैनिकांना कैद करत असतं. त्यातील काहींना इच्छेप्रमाणे शिवशाहीत घेतले जाई. त्यावेळी त्यांच्या स्त्रियांना मानाची वागणूक दिली जात होती. मरण पावलेल्या शत्रूंचा यथासांग अंत्यविधी केला जात होता. कोणत्याही मशिदीला कधीही पाडले जात नव्हते. मशिदीचाही जीर्णोद्धार स्वराज्यात होत होता. शिवाजी राजांनी मंदिरा सोबत मशिदींनाही सालाना अनुदान दिले होते. अशाप्रकारे समाजाच्या जडणघडणीत शिवाजी महाराजांनी बारकाईने लक्ष पुरवले होते. त्यामुळे भारतातले संत, महात्मे, राजे, महाराजे, कवी, साहित्यिक, कलाकार हे सर्व लोक शिवरायांना भेटण्याकरता त्यांचा आशीर्वाद मिळण्याकरता स्वराज्यात येत असतं. त्यात कोणताही जाती धर्माचा भेद नव्हता. समस्त रयतेला समाधानाने, न्यायाने प्रेमाने जगता यावे हा शिवरायांचा हट्ट होता. हा शिवरायांचा हट्ट हळूहळू स्वराज्य धर्म बनत गेला. त्यामुळे शिवाजी राजांना कल्याणकारी राजा हा किताब जनतेने दिला....

आपल्या सर्वांना ठाऊक आहे एकोणीसशे ४७ साली आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ शिवाजी राजांनी रुजवली, वाढवली आणि सन सोळाशे ७४ सली भारतभूमीला स्वातंत्र्याचा

केशरी सूर्य दाखवला. त्यावेळी हा महाराष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला होता. शिवाजी महाराजांनी त्यावेळी या भव्य महाभारताला स्वतंत्र करण्याचा शिवधनुष्य उचलला होता. याकरता भारतातील प्रत्येक छोट्या छोट्या मूळ राजवटींना शिवरायांनी आपलेपणाने सहकार्य केले होते. दुर्दैवाने तेव्हाच्या सार्वभौम भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा अर्थ कळला नाही. कारण त्यावेळी सर्व लोक प्रांता-प्रांतात विभागलेले होते. स्वार्थाने पार बरबटलेले होते. त्यांना एकीचा आवाज समजून येत नव्हता. त्यामुळे हळूहळू ही लोकसत्ता पराभूत झाली. मग ब्रिटिशांनी आपल्या देशावर राज्य केले. असे असले तरी शेवटच्या श्वासापर्यंत शिवछत्रपतींच्या शिवशाहीने भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. अशावेळी या शिवशाहीला भारतीयांची साथ मिळाली नाही. तशी साथ मिळाली असती, तर सोळाव्या, सतराव्या शतकात भारताला स्वातंत्र्य जरूर मिळाले असते.

अशा प्रकारचे लोकहिताचे स्वातंत्र्य शिवाजी महाराजांनी गर्भात असतानाच पाहिले होते. गुलामगिरीचे चक्रव्यूह कसे तोडायचे याचा सारासार अभ्यास शिवबांनी जिजामातांसोबत केला होता. त्या बळावर शिवबांनी अभूतपूर्व संघर्ष करून, शत्रूंना धूळ चारली, त्यांचा पूर्ण पराभव केला, त्यांच्या मनात स्वराज्याविषयी दहशत निर्माण केली. शिवाजी महाराजांचे सैन्य कसे येईल, कुठून येईल आणि आपल्याला कापून जाईल

हे शत्रूंना सांगता येत नव्हते. कारण शिवरायांच्या मावळयांना मरणाची भीती नव्हती. ज्याला मरणाची भीती नसते तो कसाही शत्रूच्या छावणीत घुसतो. शत्रूला मारून पशार होतो. ही भीती स्वराज्य शत्रूंच्या मनात कायम होती. ती भीती शिवरायांनी दिवसेन दिवस वाढवली. शिवाजी महाराजांचे हे धाडस रयतेच्या कल्याणासाठी होते. रयतेकरता प्राण पणाला लावण्याची ध्येयाशक्ती शिवरायांच्या मनोबळत होती. जे काही करायचे ते जनतेच्या भल्यासाठी करयचे .अशा प्रकारचे विचार शिवबांचे होते. या विचारांमुळे रयतेच्या मनात स्वराज्याविषयी विश्वास निर्माण झाला. आपल्या रक्षणासाठी, आपल्या सुखासाठी हा शिवाजी राजा दऱ्याखोऱ्यातून हिंडतो आहे. त्यामुळे या राजाला बहुजन समाजाचे प्रेम मिळाले. त्या जिव्हाळयातून सर्व जनतेने स्वराज्याला सहकार्याचा हात दिला. यातूनच नरवीर मावळे शिवरायांच्या रक्षणासाठी तयार झाले. त्या मावळयांच्या मनात एकच विचार संचारत होता. लाख मावळे खपले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा छत्रपती राजा जगला पाहिजे. असे विचार त्यावेळच्या शिवशाही समाजाचे होते. हे चैतन्यदायी विचार मातीतून उगवले. सह्याद्रीच्या कुशीत भव्य दिव्य झाले आणि हिमालयाच्या कैलासापर्यंत पोहोचले.

असे हे छत्रपती शिवाजी महाराजांचे लोक कल्याणकारी राज्य होते. या राज्यात मानवधर्माचा, सर्वधर्मसमभावाचा, अठरापगड जातींचा सन्मान केला जात होता. समस्त स्त्रीशक्तीला माता, भगिनींचा दर्जा दिला जात होता. शेतकऱ्यांना आत्मसन्मानाने वागवले जात होते. म्हणून स्वराज्याच्या मनामनात समाधान नांदत होते. सर्व गावांचे जीवन स्वयंपूर्ण होते. म्हणून मी 'शिवाजी महाराजांचे कल्याणकारी राज्य' हा विषय घेतला. यातून आपल्याला कल्याणकारी राज्य कसे असावे याची कल्पना येईल. या विचारांची आजच्या समाजाला गरज आहे. म्हणून मी हा विषय आपल्या समोर आणला आहे.

जय भवानी जय शिवाजी



# हिंदू जीवनप्रणाली आणि विवेकानंद विचार'

जगातल्या अतिप्राचीन धर्मांपैकी एक धर्म म्हणून भारतातील हिंदू धर्माला ओळखले जाते. कदाचित इतर धर्मांची उत्पत्तीही त्यावेळी झाली नसावी. इतका हा पुरातन भारतीय हिंदू धर्म आहे. या हिंदू धर्माला त्या

काळात धर्म म्हणून संबोधले जात नव्हते. वेदशास्त्र हा शब्दप्रयोग त्याकाळी वापरला जात होता. प्रत्यक्ष भगवत गीतेच्या श्लोकांमध्येही हिंदू धर्म आसा उल्लेख सापडत नाही. माणसाच्या केवळ आचरण बुद्धीला त्यावेळी धर्म असे म्हंटले जाई. त्या काळात कुठेही धर्म या शब्दा आधी हिंदू हा शब्द जोडून वेदशास्त्राला संकुचित केले नव्हते. असा हा हिंदू धर्म खुल्या मनाचा होता. अशीही हिंदू धर्माची मुळातील संकल्पना आहे. यावर अधिक विस्तृतपणे भाष्य केले जाऊ शकते. इतका हा सखोल हिंदू धर्म आहे परंतु आजचा विषय हिंदू जीवनप्रणाली असा आहे. म्हणून आपण आज हिंदू धर्माच्या तत्वशास्त्राची चर्चा करणार नाही.

या हिंदू धर्माची किंवा वेदशास्त्राची निर्मिती आर्यांनी केली. भारताच्या वायव्येकडील खैबर खिंडीतून काही आर्य टोळया भारतात आल्या. या आधी त्यांचा निवास युरोपातील कॉकेशस पर्वत भागात होता. आर्य भारतात आल्यावर त्यांचा संघर्ष अनार्य लोकांशी झाला. हे अनार्य लोक सिंधू संस्कृतीचे निवासी होते किंवा द्रविडीयन होते. आर्य टोळया या निवासी समजापैक्षा प्रगत होत्या. आर्य हे सभोवतालच्या निसर्गाचा अभ्यास करत. त्या अभ्यासातून आर्यांनी निसर्गाला पूज्य देवता मानले. या पूजनातून आर्यांनी निसर्ग विज्ञानाला वैदिक शास्त्राच्या चौकटीत आणले. इथूनच पुढे वैदिक शास्त्र काळाला सुरुवात झाली. या वैदिक शास्त्रातून

आर्यांनी पंचमहाभूतांनाच देव मानले. आर्य लोक हे अतीप्रगत असल्याने त्यांनी भारतात सर्वोत्तम समाजव्यवस्था निर्माण केली. माणसाने माणसाशी कसे वागावे कसे वागू नये याची मार्गदर्शक तत्त्वे तयार केली गेली. जनतेवर अन्याय, अत्याचार होऊ नये. म्हणून आर्यांनी जनतेचा पालनहार राजा हे पद स्थापित केले. यातून राज्यव्यवस्था निर्माण झाली. इथून पुढे भारतीय वंशाच्या राजवटी सुरु झाल्या. अशाप्रकारे समाज जीवनाला योग्य दिशा मिळण्याकरता आर्यांनी राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रयत्न केला. त्यात आर्य यशस्वी झाले.

अशा या सर्व गोष्टींसाठी आर्यांनी वेदांची निर्मिती केली. त्यातून ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद अशा चार वेदांची शृंखला तयार होत गेली. यातूनच पुढे उपनिषदे लिहिली गेली. या सर्व ग्रंथांचा, विचारांचा अभ्यास सुरू झाला. त्यातून आर्य काळातील समाज अधिक विकसित होऊ लागला. या ग्रंथांचे, वैचारिक बैठकीचे पुढील पिढ्यांसाठी जतन, संवर्धन सुरू झाले. म्हणून हे वैदिक शास्त्र आजपर्यंत टिकून आहे. हे वेद किंवा उपनिषदे एका व्यक्तीकडून लिहिली गेली नाहीत. अनेक विद्वान, आचार्य, ऋषिमुनींनी हे विचार शब्दबद्ध केले. म्हणून हे वैदिक शास्त्र संकुचित दृष्टिकोनाचे बनले नाही ते खुल्या विचारांचे व्यासपीठ बनले. या वैदिक

शास्त्राचे म्हणजे हिंदू धर्माचे अनेक पंथ उदयास आले. अनेक विचारधारा वैदिक शास्त्रात जोडल्या गेल्या. त्यातून हा धर्म अधिक मजबूत झाला.

या वेदशास्त्रातून जनलोकांना सांगण्यात आले. आपण सर्व जण निसर्गाचे घटक आहोत. त्यामुळे आपण निसर्ग विज्ञानानाप्रमाणे वागावे. निसर्गाशी एकरूप होऊन आपले जीवन जगावे. म्हणून आपल्या वेदशास्त्रात ऋतूनूसार जीवन जगण्याची जीवनशैली निर्माण झाली. यातून आयुर्वेदशास्त्र पुढे आले. चुकीच्या जीवनशैलीने वागून अनारोग्य आणण्यापेक्षा आधीपासूनच उचित जीवनशैली ठेवा. म्हणजे निसर्ग विज्ञानानाप्रमाणे जगत चला. असा हा वेदशास्त्राचा, आयुर्वेदाचा सिद्धांत होता.

त्याचप्रमाणे माणसाने आपल्या वैयक्तिक जीवनात, सार्वजनिक जीवनात कसे वागावे. कुठली गोष्ट करावी, कुठली गोष्ट करू नये. याचाही मापदंड वैदिक शास्त्राने घालून दिला होता. विचारसरणी आणि आरोग्य या दोन घटकांना वेदशास्त्राने फार महत्व दिले होते. या सर्वातून आपला प्राचीन हिंदू धर्म उदयाला आला. भारतीयांनी तो चालवला, वाढवला त्यास भारतीय संस्कृतीचा दर्जा देला.

रामायण, महाभारत या काव्यग्रंथातातही माणसाने नेमके कसे वागावे. हा विचार आपल्या सर्वांना दिला आहे. रामाने आपल्या पित्याची आज्ञा पाळून अरण्य वनवास भोगला. रामाच्या प्रेमापोटी लक्ष्मणाने काही कारण

नसताना वनवास भोगला. त्याच वेळी भरताने रामाच्या नावाने आयोध्या राज्य चालवले. हा सर्व त्यागाचा महिमा आहे. आयोध्येत असताना व नंतर वनवासात गेल्यावर रामाने सर्व लोकांना मदतीचा हात दिला. त्यां सर्वांकरता रामाने असुरांचा नाश केला. तो एक रामाचा स्वराज्यधर्म होता. कोणत्याही पदावर नसताना रामाने लोक कल्याणाकरता नेतृत्व केले. जनतेत आदर्श निर्माण होण्याकरता रामाने जनतेच्या मनासारखे केले. त्यामुळे सीतेला वनवास भोगावा लागला पण नंतर जनता सीतेच्या आदर्शापुढे नतमस्तक झाली, जनतेला त्यांची चूक कळाली. हा रामाचा आदर्शवादी प्रयोग होता. अशी अनेक उदाहरणे रामायणात आहेत. त्याचप्रमाणे महाभारतातही सामाजिक धर्माची अनेक उदाहरणे आहेत. त्या सिद्धांतामधला हा एक महत्वपूर्ण सिद्धांत, यात सांगितले गेले आहे. अविचार जेव्हा समाजात वाढतो तेव्हा कधीना कधी त्या अविचाराचा कडेलोट होतो. म्हणजे कोणी ना कोणीतरी देव माणूस त्या भूमीवर जन्माला येऊन अविचाराचा विनाश घडवून आणतो. हे वैश्विक सत्य महाभारताने पटवून दिले आहे. म्हणून आपण सर्वजण आजही भगवान श्रीकृष्णाच्या गीतेचा आधार घेतो. त्याप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. याचा अर्थ असा हिंदू धर्म केवळ एक धर्म नसून ती एक जीवनप्रणाली आहे. हा विचार येथे स्पष्ट होतो.

स्वामी विवेकानंद म्हणतात, हिंदू धर्म हा प्राचीन असला, तरी तो अनेक विचारांचा समुच्चय आहे. विभिन्न विचारसरणीतून हा धर्म खऱ्या अर्थाने बळकट झाला आहे. अनेक नद्या ज्याप्रमाणे एकाच सागराला जाऊन मिळतात तसाच हा हिंदू धर्म आहे.

हिंदू धर्माच्या पूजा विधीतही अमूलाग्र बदल झालेला आहे. आर्य तेव्हा भारतात आले तेव्हा त्यांची पूजा विधि वेगळी होती. यज्ञयागाला आर्यांनी महत्त्व दिले होते पण काळाच्या ओघात हळूहळू मूर्तिपूजा वाढू लागली. त्यानुसार देवी-देवतांचे वेगवेगळे उपासक, भक्त तयार होतं गेले, विविध आचरण पद्धती निर्माण झाल्या. त्यातून आजचा हिंदु धर्म आपल्यासमोर आला आहे. म्हणजे काळानुसार धार्मिक पद्धतीही बदलत गेल्या. लोकांचे विचार ज्याप्रमाणे बदलले त्याचप्रमाणे या हिंदू धर्मातही काही बदल झाले पण त्यातील मूल्याचा गाभा तोच राहिला. तो गाभा कुणीही हालवला नाही. म्हणून हा.धर्म काळाच्या ओघात अजूनही टिकून राहिला आहे.

म्हणून आपल्या भारतीय संस्कृतीने अनेक परकीय धर्म, पंथांना स्वीकारले आहे. विवेकानंद म्हणतात, या हिंदू धर्माने कधीही परकीय धर्माचा तिरस्कार केला नाही. त्या लोकांचे धर्मांतर (धर्मपरिवर्तन) हिंदू धर्मात केले नाही. कारण हिंदू धर्माला माहित आहे प्रत्येक धर्माच्या आचरण

पद्धती वेगळ्या असल्या, तरी त्यांचे अंतिम ध्येय परमेश्वराला आळवणे, त्यात समरस होणे हेच आहे. शेवटी परमेश्वर हा एकात्मिक आहे आणि त्याला प्राप्त करणे हा माणसाचा स्वभावधर्म आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले, तर वैचारिक समन्वय साधने म्हणजे हिंदू धर्म होय. अशाप्रकारचे विधान स्वामी विवेकानंदांनी जागतिक धर्मपरिषदेत केले होते. ज्ञानेश्वर माऊलींनीही हेच आपल्याला सांगितले आहे. सर्व माणसात, पशू पक्षात आणि चराचरात एकच परमेश्वराचा आत्मा आहे. त्यामुळे त्यांनी 'हे विश्वची माझे घर' असे म्हंटले आहे. या विचार चिंतनातून मी 'हिंदू जीवनप्रणाली आणि विवेकानंद विचार' हा विषय आपल्यासमोर आणला आहे. आपण सर्वांनी या विषयातून नवा ध्यास घ्यावा. आणि आपल्या या मानवतावादी धर्माचा अभ्यास सुरू करावा. त्यातूनच स्वामी विवेकानंदांचे विचार युवकांपर्यंत पोहोचतील.

# जीवनविद्या एक सकारात्मक प्रवास'



जीवन हे नित्य नवीन आहे. म्हणून हे जीवन सकारात्मक आहे. कालचा दिवस रात्रीच्या अंधारात मिटतो. मग दुसऱ्या दिवशी सकाळी नवीन सूर्य उगवतो. त्या उगवत्या सूर्याबरोबर आपले जीवन सुरू होते. भारतरत्न सचिन तेंडुलकर म्हणतात, काल मी शतक केले पण तो दिवस कालचा होता. आजचा दिवस पूर्णपणे नवीन आहे. त्यामुळे आज मी काय करू शकतो, किती धावा करू शकतो. यावर माझा खेळ अवलंबून आहे! याबाबतीत छत्रपती शिवाजी महाराज म्हणायचे, स्वराज्यात कालच्या पुण्याईवर आजचा दिवस उजाडत नाही! म्हणून नवीन उगवणारा आजचा

दिवस महत्वाचा आहे. तो नव्याने सकारात्मकतेने जगावा. याचा अर्थ जीवन हे नित्य नवीन आहे आणि ते सकारात्मक आहे. म्हणून उत्साहाने प्रत्येक दिवशी जीवनाला सुरुवात करावी. मागील दिवसाचा जास्त विचार करू नये. आता काय करायचे याला खरंतर महत्व आहे पण माणूस तसं करत नाही. तो मागील दिवसांचा जास्त विचार करतो, वर्तमानात जगत नाही आणि दूरदृष्टीने भविष्याचा विचार करत नाही. उलट भविष्याला नकारार्थी नजरेने बघतो, काळजी करतो. वर्तमान जेव्हा चांगले होत जाईल तेव्हा भविष्य उज्वल असेल. कारण एक एक दिवसाच्या वर्तमानातून भविष्य घडत असते. असा विचार या भूतलावर सामान्य माणूस करत नाही. हे या माणसांचे दुःख आहे.

माणूस जीवन जगत असताना कायम ओझ डोक्यावर घेऊन मिरवत असतो. उगाचच तो जीवनाला धकाधकीच्या चक्रात ढकलत असतो. आज जीवन जगताना मोठा संघर्ष जरूर करावा लागत आहे परंतु पूर्वीच्या काळीही असाच संघर्ष द्यावा लागत होता. म्हणून माणूस हा जीवन संघर्षापासून वेगळा होऊ शकत नाही. काळ कुठलाही असो माणसाला संघर्ष अटळ आहे. तो कुणासाठीही चुकलेला नाही. आजचा माणूस पैशाच्या मागे धावतो. कारण पैसा हा माणसाला सुखी करण्याचा एकमेव मार्ग आहे. ते एक न संपणार वास्तव आहे. हा पैसा जरूर मिळवला पाहिजे

पण तो कशासाठी मिळवायचा आहे हे माणसाने समजून घ्यायचे आहे. माणूस मूलभूत सुखाच्या ही पलीकडे जाऊन पैसा कमवतो तेव्हा तो माणूस चुकीच्या मार्गाने संपत्ती गोळा करतो. या संपत्तीतून तो अति जास्त श्रीमंत होतो. त्यावेळी तो अविचार, भ्रष्टाचार करायलाही मागेपुढे पाहात नाही. अशा अनियंत्रित सुखामागे कोणी लागू नये पण माणूस अशा सुखामागे लागतो. मग तो जीवनाचा खरा अर्थ विचारतो. अशांती, असमाधान अशा गोष्टी त्याच्या मनात फिरत असतात. मग तो सुखी होण्याऐवजी अतिशय दुःखी होऊन जातो. त्यातून तो अध्यात्मिक मार्गाला लागतो.

हा अध्यात्मिक मार्ग त्याला सरळ मार्गावर आणत नाही. उलट हा अध्यात्मिक मार्ग त्या माणसाला अंधश्रद्धा, अंधविश्वासाकडे घेऊन जातो. त्याच्या मनात असलेली मूलभूत दैवी श्रद्धा हे अध्यात्मिक लोक नाहीशी करतात. म्हणजे त्याच्या श्रद्धेला कर्मकांडाचे तेल, मीठ लावून त्यास अंधश्रद्धेकडे वळवतात. एकदा तो माणूस अंधश्रद्धत गुरफटला की त्या माणसाकडून पैसा कसा खेळवता येईल याचा विचार हे अध्यात्मिक गुरु करू लागतात. सुख, शांती मिळवण्यासाठी लोक या बुवा, बाबांच्या आहारी जातात. आपल्या जवळील मेहेनतीचा पैसा किंवा अविचाराने, भ्रष्टाचाराने मिळवलेला पैसा या ढोंगी आध्यात्मावर खर्च करतात. या सर्व गोष्टीत कुठलाही बुवा, बाबा लोकांना हे सांगत नाही की हे भल्या माणसा

तू फक्त आपल्या कष्टाच्या पैशाने जीवन चालव, चुकीच्या मार्गाने ढोंगी मार्गाने पैसा वाढवू नको पण आध्यात्मिक बुवा, बाबा तसं करत नाहीत. कारण त्यांना आयत्या पैशावर डल्ला मारायचा असतो. असे अध्यात्मिक लोक समाजात सर्वदूर पसरले आहेत. त्यामुळे बुद्धिजीवी, विज्ञाननिष्ठ माणसाला कायम एक भीती सतावते. कोण माणूस कसा असेल सांगता येत नाही.

यामुळे त्या बुद्धिजीवी माणसांना अध्यात्माचा खरा मार्ग सापडत नाही. त्यामुळे माणसांचा उन्नती, विकास, उत्कर्ष होऊ शकत नाही. आपले जीवन जगता जगता अध्यात्मिक कसे व्हावे. याची निश्चित दिशा या माणसांना सापडत नाही.

अशावेळी प्रत्येक माणसाने ही पुढील प्रार्थना वाचायची.

**हे ईश्वरा**

**सर्वांना चांगली बुद्धी दे, आरोग्य दे**

**सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव**

**सर्वांच भलकर, कल्याणकर, रक्षणकर**

**आणि तुझे गोड नाम मुखात अखंड राहू दे.**

या विश्वप्रार्थने खाली सद्गुरु श्री वामनराव पै यांचे नाव आहे ते नाव गुगलवर जाऊन टाईप करायचे आणि जीवनविद्या मिशनचे व्हिडिओ ऐकायचे. मग एखाद्या ऑनलाइन कार्यक्रमात जायचे, सद्गुरुंचा अनुग्रह घ्यायचा. या जीवनविद्येच्या तत्वज्ञानाचा आपण अभ्यास केला, तर आपल्या मनातील अहंकाराचा, अविचारांचा, अंधश्रद्धेचा, अंधविश्वासचा स्वभाव गळून पडेल तेव्हा माणूस खऱ्या अर्थाने प्रयत्नशील होईल. मग आपल्या अंग मेहेनतीने, बुद्धीने, सद्भावक जीवनाने, आत्मविश्वासाने माणूस यशस्वी होईल. त्यावेळी त्याला ढोंगी बुवा, बाबांचा, गॉडफादरचा आधार घ्यावा लागणार नाही. कारण जीवनविद्या मिशनचे कार्य सामाजिक अध्यात्मातून निसर्ग विज्ञानाकडे जाते. त्यामुळे माणसाच्या जीवनाला कायमस्वरूपी दिशा मिळते. ही दिशा माणसाला उत्कर्षाकडे घेऊन जाते. त्यामुळे प्रत्येक माणसाने आपल्या जगण्यात जीवनविद्येचा अवलंब करावा. ही जीवनविद्या माणसाला सद्विचार देऊन त्यांच्यात आत्मबळ निर्माण करून देते. त्यावेळी प्रत्येक माणूस दुसऱ्याला सुख देत देत स्वतः ही सुखी समाधानी होऊन जातो.

१९५२ साली सद्गुरु वामनराव पै यांनी या जीवनविद्येची मुहूर्तमेढ रवली. मंत्रालयात अर्थसचिव या पदावर असताना देखील सद्गुरु श्री वामनराव पै यांनी कीर्तन, प्रवचन, प्रबोधनाचे छोटे-मोठे कार्यक्रम करत.

समाजाला दिशा देण्याचे प्रमुख असे कार्य केले. त्यातून त्यांनी लाखो नामधारक म्हणजे साधकांना जीवंविद्येशी जोडले. त्यातून महाराष्ट्र राज्यात अनेक जीवनविद्या मिशनच्या शाखा तयार झाल्या. या शाखांची हजारो केंद्रे निघाली. त्या केंद्रांमधून हरिपाठ पठण म्हणजे उपासना यज्ञ, बालसंस्कार, युवासावकार असे केंद्र प्रणित उपक्रम सुरू करण्यात आले. निरनिराळ्या विषयातून सद्गुरूंनी नामधारकांना प्रबोधित केले. त्यातून नामधारक सदशिष्य प्रबोधक तयार होत गेले. या सर्वातून जीवनविद्येचे विचार सर्वदूर पसरले. सरकारी नोकरीत काम करत असताना सद्गुरू वामनराव पै यांना आरामदायक जीवन मिळू शकत होते परंतु त्यांनी आपला संध्याकाळचा मोकळा वेळ जीवनविद्याच्या कार्याला वाहिला. विज्ञाननिष्ठ विचार अध्यात्मशास्त्राला जोडले. त्यातून 'सामाजिक अध्यात्म संस्था' म्हणून जीवंविद्येची ओळख निर्माण झाली. विज्ञान आणि आध्यात्म यांचा पुरेपूर संयोग करून सद्गुरु वामनराव पै यांनी हा जीवन परिवर्तनाचा विचार घडवून आणला. अविचार, अहंकार, अंधश्रद्धा यांच्यावर सद्गुरुनी प्रहार केला. माणसाने माणसाशी, कुटुंबाशी अथवा समाजाशी कसे वागावे याची सुंदर शिकवण दिली. त्यामुळे जीवना बाबतीत अज्ञानी लोक खऱ्या अर्थाने सज्ञान झाले. कृतार्थ, यथार्थ जीवन जगू लागले. निसर्ग विज्ञानाचे तत्व सांगून सद्गुरुंनी निसर्ग नियम समजावून दिले. त्यातून नामधारकांना 'पर्यावरण

हाच नारायण' हा सिद्धांत पटवून दिला. 'लववर्क' या सिद्धांतातून यशस्वी उद्योग योग शिकवला. आपल्या प्रामाणिक कार्यातून राष्ट्राची प्रगती व विकास होतो. हे सद्गुरुनी स्वतःच्या कार्यातून सिद्ध केले. सद्गुरु वामनराव पै म्हणायचे जीवनविद्येत किती नामधारक आहेत. यापेक्षा किती लोकांमध्ये वैचारिक नकळत क्रांती घडली याला मी महत्त्व देतो. जगातील जनमाणसात विज्ञाननिष्ठ वैचारिक क्रांती व्हावी. असे सद्गुरूंना कायम वाटत होते.

आज सद्गुरू वामनराव पै आपल्यात नाहीत पण त्यांची जीवनविद्या या विश्वात सर्वत्र संचार करते आहे. आपल्या मूळ २९ ग्रंथातून जीवनविद्या सर्वांच्या समोर येते. गुगलवर, युट्यूबवर, फेसबुकवर जीवन विद्येचे हजारो व्हिडिओ पहायला मिळतात. त्याचबरोबर अनेक ऑनलाइन कार्यक्रम सुरु असतात. कर्जत येथील ज्ञानपीठ केंद्राद्वारे सद्गुरूंनी जीवनविद्येला अतिशय भव्य स्वरूप दिले आहे. त्यामुळे जीवन विद्येचे कार्य अधिक गतीने सुरू आहे. जीवनविद्येने अनेक मानव कल्याणकारी कोर्सेस निर्माण केले आहेत. वयाच्या, कामाच्या, जबाबदारीच्या भिन्नतेनुसार हे कोर्स इच्छुकांना दिले जातात. त्याकरता सर्वांनी गुगलवर जाऊन हे जीवनविद्येचे दार उघडावे आणि आपल्या प्रगतीसाठी, विकासासाठी, उत्कर्षासाठी जीवनविद्येचे हे तत्वज्ञान जाणून घ्यावे, आपल्या जीवनात ते आत्मसात करावे, तरच माणसाला आपले जीवन छान, सुंदर, अप्रतिम बनवता येईल. त्यातून

आपला भविष्यकाळ प्रगत विचाराचा होईल. म्हणजे आपल्या मुलांच्या जीवनात आमूलाग्र बदल होईल. त्याकरता जीवनविद्येचा दरवाजा उघडायला हवा. सद्गुरु वामनराव पै यांचे चिरंजीव प्रल्हाद दादा पै याकरता अहोरात्र झटत आहेत. लोकांचे जीवन सकारात्मक व्हावे यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या या प्रयत्नाला आपण सर्वांनी गती द्यावी. यातच आपले कल्याण आहे. म्हणून मी 'जीवनविद्या एक सकारात्मक प्रवास' हा विषय आपल्यासमोर आणला आहे. तो आपण लक्षात घेऊन जीवनाला सकारात्मकतेकडे वळवावे आणि विज्ञाननिष्ठ अध्यात्माचा हा विचार आपल्या मनात कृतीत आणावा.

**तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार**

**(सदगुरु वामनराव पै)**

# 'स्वाभिमानी मराठीशाही आणि भारतीय इतिहास'



१६८० साली शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात एक पोकळी निर्मान झाली, असे औरंगजेबाला वाटले. मग त्याने आपला मोर्चा दख्खनेत वळवला. त्याने एका अजगराप्रमाणे स्वराज्याला गिळंकृत करण्याचा आत्मविश्वासाने प्रयत्न केला. हा त्याचा प्रयत्न अपयशी ठरला. कारण शिवाजी महाराज गेल्यावर संभाजी राजांनी स्वराज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन, पुढच्या नऊ वर्षात औरंगजेबाशी यशस्वीपणे लढा दिला. संभाजीला हरवणे औरंगजेबाच्या सरदारांना कठीण जात होते. मात्र अखेरीस फितुरीमुळे संभाजी महाराज औरंगजेबाच्या दरबारात कैद करून आणले गेले. वयाने थकलेल्या औरंगजेबाला वाटले.

संभाजीने हिंदू धर्म सोडून माझ्या धर्माचा स्वीकार केला, तर माझी मुघलसेना बळकट होईल. त्याच वेळेला औरंगजेबाला असेही वाटत होते. संभाजी संपल्यावर स्वराज्य आपल्या ताब्यात येईल. कारण त्याला हेही माहिती होते संभाजी कधीही माझ्या धर्मात येणार नाही. तेच झाले आणि संभाजीला हालहाल करून मारण्यात आले. औरंगजेबाच्या मनात आले आता मराठा सैन्य गर्भगळीत होईल. आपण या मराठ्यांना गुलाम बनवू.

औरंगजेबाने तशा प्रकारचे प्रयत्न सुरू केले. त्यामुळे राजाराम महाराजांना स्वराज्यापासून दूर राहावे लागले. राज्य चालवावे की मुघलांवर मात करायची.

या जीव घेण्या प्रसंगात राजाराम महाराज पळापळीच्या संघर्षत अडकले होते. त्यावेळी राजारामांची पत्नी ताराराणी एक हाती स्वराज्य सांभाळत होती. अनेक मराठा शूर सरदार ताराराणीच्या आदेशा खाली जीवाची बाजी लावत होते. त्या सर्वांचे स्वप्न एकच होते. औरंगजेबाला या महाराष्ट्राच्या मातीत गाडायचे. हे स्वप्न सहज साध्य होणारे नव्हते. अनेक अडचणींवर मात करत. मराठ्यांचे प्रयत्न सुरू होते. त्याचवेळी धूर्त होऊन औरंगजेबाने रायगड किल्ला आपल्या ताब्यात घेतला. राजमाता येसूबाई आणि इतर कुटुंबीयांना औरंगजेबाने ओलीस ठेवले. अशा परिस्थितीतही स्वराज्य मुघलांच्या हाती लागले नाही. मोघलांचा पदोपदी पराभव होतच

राहिला. त्या काळात औरंगजेब दबक्या पावलाने आपली चाल खेळत होता. मात्र त्या चालीत तो शिवरायांच्या कुटुंबाला दगाफटका करू शकत नव्हता. कारण संभाजीला मारल्यावर मराठे अधिकच उसळले होते, तसे काही होऊ नये. अशा या संघर्षात अडकून औरंगजेब आपल्या श्वासाचे शेवटचे दिवस मोजत होता. काळाने त्याला धरून महाराष्ट्राच्या मातीत गाडले. मुघलांचा राक्षसी कणा मोडला.

त्याकाळी स्वराज्यात यादवी संघर्ष सुरू झाला, तरी सुद्धा मराठ्यांनी स्वराज्य शत्रुंना नामोहरन केले. पुढे छत्रपती शाहूंच्या राज्यात मराठाशाहीची सर्व सूत्रे पेशव्यांकडे आली. त्यानंतर पेशवाईने आपले हे स्वराज्य राखले ते वाढवण्यास सुरुवात केली. बाळाजी विश्वनाथ हे या स्वराज्याचे पेशवे झाले. त्यांची ही कामगिरी सुरु असताना अल्पावधीत बाळाजी विश्वनाथ मरण पावले. त्यानंतर त्यांचा वीस वर्षांचा थोरला मुलगा बाळाजी बाजीराव बल्लाळ पेशवाईच्या पदावर आला. त्यावेळी बाजीराव व त्याचा भाऊ चिमाजी अप्पा या दोघांनी मोठे रणकंदन माजवले. भारतातील सर्व राजवटीवर या मराठाशाहीने आपला अंमल बसवला. केवळ ४० वर्षांच्या आयुष्यात बाजीरावाने ४० लढाया जिंकल्या होत्या. त्याने कधीच पराभव पाहिला नव्हता. निजाम, जाट, रोहिले, शिख, रजपुत या सर्वांना बाजीरावाने आपल्या अधिपत्याखाली आणले होते. डज,

पोर्तुगीज, इंग्रजांनाही त्याने शह दिला. असा हा शूर योद्धा १७४० ला स्वर्गलोकी गेल्यावर बाळाजी नानासाहेब पेशवाई पदावर आले.

नानासाहेब पेशव्यांनी फार कमी काळात मराठा साम्राज्याचा पाया मजबूत करत, दक्षिणेतही हिंदवी स्वराज्याचा विस्तार केला. नानासाहेबांनी थोरल्या बाजीरावांप्रमाणे साम्राज्यवादी धोरण स्वीकारले. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांना कायदेशीर आणि प्रशासकीय अशी सर्व सूत्रे सोपवली. पुढे शाहू राजे कालवश झाल्यावर मराठ्यांची सार्वभौम सत्ता नानानी चालवण्यास सुरुवात केली. म्हणजे छत्रपतींच्या नावाने स्वराज्य दौलतीचा कारभार बाळाजी नानांनी सांभाळला. नानासाहेबांनी आपल्या कारकिर्दीत अर्ध्याहून अधिक हिंदुस्थानावर मराठ्यांचे राज्य प्रस्थापित केले. त्यावेळी त्यांनी पुणे शहराचा विकास घडवून आणला. त्यासमई उत्तरेत शिवशाहीची जरब निर्माण झाली. त्यामुळे मराठी सत्तेचा भगवा सर्वश्रेष्ठ होऊन भारतीय आसमानात फडकत होता. बलाढ्य मराठाशाही सत्ताधीश बनली होती परंतु १७६१ मध्ये जगप्रसिद्ध पानिपताची तीसरी लढाई झाली. या महायुद्धात मोहम्मद शहा अब्दाली दिल्ली हस्तगत करण्यासाठी आला. त्यावेळी मुघलांच्या मदतीला शक्तिशाली मराठासेना धाऊन आली. विजयश्री मराठ्यांकडे झुकणार असा विश्वास सैन्याच्या मनात तयार झालेला असताना,

विश्वासराव मारला गेला. मग पानिपत युद्धाचे पारडे मोहम्मद शहाकडे झुकले आणि मराठ्यांचा अभूतपूर्व पराभव झाला. यात २८ हजाराहून जास्त लोक मारले गेले. सेनापती सदाशिवराव भाऊ वीरगतीस प्राप्त झाले. भावाच्या व मुलांच्या मृत्यूमुळे नानासाहेब पेशवे खचून गेले. त्यांना ही हार सहन झाली नाही. त्यात ते मृत्यूमुखी पडले. त्यानंतर माधवराव, पेशवाईच्या गादीवर आले.

१६ वर्षांचे माधवराव पेशवे जेव्हा राज्यसत्तेवर आले तेव्हा पानिपताच्या पराभवामुळे मराठा साम्राज्याची फार मोठी हानी झाली होती. बलशाली मराठाशाही त्यामुळे कमजोर समजली जात होती. त्यावेळी माधवराव पेशवे यांनी हिंदवी स्वराज्याला मजबूत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सुरुवातीच्या काळात माधवराव अल्पवयीन असल्यामुळे काका राघोबादादांना वाटत होते. आपल्याला पेशवे पद मिळावे पण तसे झाले नाही. म्हणून राघोबा नाराज झाले. या एका गोष्टीमुळे काका-पुतण्यात वादाची ठिणगी पडली, त्याचा पुढे निखारा झाला. या दुहीचा फायदा निजामाने घेतला. सेनापती राघोबा आणि निजाम यांच्यात राक्षसभुवन येथे लढाई झाली. रघोबांची हार होणार इतक्याच माधवसेना निजामसेनेवर चढाई करुन गेली, अशाप्रकारे मराठ्यांचा विजय झाला. निजामाच्या काही प्रदेशांवर मराठ्यांनी मग कब्जा मिळवला. यानंतर लगेचच माधवरावाने

दक्षिणेत आपला शत्रू हैदर अली याला पराभूत केला. त्याच्याकडे गेलेले आपले सर्व प्रदेश पुन्हा मिळविले. उत्तरेत जाट, राजपूतांनी थांबवलेल्या आर्थिक व्यवहाराची वसुली करून, पानिपत युद्धात त्रास देणाऱ्या रोहील्यांवर हल्ला चढवून रोहिलखंड उद्ध्वस्त केला. माधवराव, शिंदे, होळकर या संयुक्त फळीने पानिपताच्या मानहानीचा डाग पुसून काढला. त्यावेळी दिल्लीत मुघल बादशाहा शहा आलम हा पदच्युत झाला. निजामाचा नातू गजूउद्दीने वजीर पद बळकावून दुसरा आलमगीर याला त्या तक्तावर बसवले. अशावेळी दिल्ली रक्षक मराठ्यांनी शहा आलमला पुन्हा दिल्लीच्या सिंहासनावर बसवले.

दिल्ली परत हिंदवी स्वराज्याला मिळाली. पुढे मोहिमेची तयारी करत असताना, क्षयरोगाने अल्प आयुष्यी माधवरावांचा मृत्यू ओढवला. यानंतर सवाई माधवराव नाट्यमयरित्या पेशवे पदावर विराजमान झाले.

माधवराव पेशवे मृत्यू पावल्यावर रघुनाथरावांनी म्हणजे राघोबांनी कपटाने माधवराव यांचा अल्पवयीन भाऊ नारायणाचा खून घडवून आणला. त्यामुळे राघोबा स्वयंघोषित पेशवा झाले पण बाराभाईच्या कारस्थानात, नारायणरावाचा अगदी लहान मुलगा सवाई माधवराव याला मातेच्या मांडीवर बसवून पेशवा केले. त्यावेळी रघुनाथराव यांनी ब्रिटिशांशी संधान बांधले. मग नाना फडणवीस आणि महादजी शिंदे या बाराभाई

कारभाऱ्यांनी ब्रिटिशांचा पूर्ण पराभव केला. रघुनाथरावाला नजरकैदेत केले. त्यानंतर महादजी शिंदे यांनी राजस्थान जिंकून, पंजाबात शिखांकडून चौथाई वसूल केली. हैदराबादेत निजामाचा पराभव केला. दक्षिणेत टिपू सुलतानवर विजय मिळून, आपल्या राज्याच्या सर्व सीमा मजबूत केल्या. त्या काळात दिल्लीच्या तक्तावर प्रबळ मराठा सैन्यसत्तेचा भगवा फडकत होता. या कौतुकास्पद कामगिरीमुळे सवाई माधवराव यांनी द ग्रेट मराठा महादजी शिंदे यांचा गौरव केला.

असा हा मराठाशाहीचा स्वाभिमानाचा रोमांचक इतिहास आहे. जर का 'लढवय्ये पेशवे सेनानायक' अल्प आयुष्यी ठरले नसते, तर १८१८ साली मराठाशाहीचा अस्त आणि ब्रिटिशसत्तेचा उदय झाला नसता पण नियतीपुढे कुणाचे काही चालत नाही. म्हणून या इतिहासातून काय घ्यायचे काय नाही हे आपण ठरवावे. कारण मराठ्यांचा हा स्वाभिमानी इतिहास कुणी फारसा विचारात घेतलेला नाही. यामुळेच मी हा छोटासा पण वेगवान इतिहास आपल्यासमोर मांडला आहे. हा इतिहास विस्तीर्ण आहे व चिंतनात्मक आहे. यातून प्रत्येक मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत होऊ शकतो. म्हणून या लेखाचे शीर्षक 'स्वाभिमानी मराठीशाही आणि भारतीय इतिहास' असा आहे.

# 'शहाजीराजे, जिजाऊ आणि हल्लीचे आई वडील'



हिंदवी स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोठ्या कष्टाने स्वातंत्र्याचे, न्यायाचे राज्य निर्माण केले. या सर्वाची प्रेरणा शहाजीराजे आणि जिजाऊ यांच्या विचारातून शिवाजी राजांना मिळाली. परकीय राजवटींच्या छायेत असताना शहाजींना एक दिवशी स्वराज्य उभारण्याची कल्पना मनात आली व त्यांनी त्याकरता प्रयत्न सुरु केले. हे प्रयत्न करत असताना त्यांच्या लक्षात आले. आपण जर स्वतंत्र राज्याची आता हालचाल केली, तर ती या परकीय राजवटींच्या डोळ्यात खुपेल.

त्यामुळे एकाच वेळी या राजवटींचे क्षत्रूत्व आपल्या अंगावर येईल. मग स्वराज्याचे स्वप्न आधुरे राहिलं. हा विचार करुन शिवाजीराजांच्या मनात हे स्वप्न यांनी पेरले.

जिजाऊंच्या बालपणी आपल्या जाधव घराण्याचे राजकारण पाहताना, स्वतंत्र राज्याचे स्वप्न जिजाऊंनी आपल्या उराशी बाळगले. बालपणापासूनच त्यांनी रयतेच्या कल्याणाचा विचार केला. म्हणून जिजाऊंनी आपल्या भावंडांसोबत तलवारबाजीचे प्रशिक्षण घेतले, प्रसंगी तलवारही उचली. पुढे जिजाऊंचा विवाह शहाजीराजांशी झाल्यावर त्या दोघांच्याही मनात स्वराज्याचा एकच विचार मुरु लागला होता. म्हणून म्हणतात गर्भात असताना, शिवाजीराजांवर स्वराज्याचे संस्कार झाले. मग जन्माला आल्यावर पुर्ण बालपणात शिवबांवर स्वराज्याचेच संस्कार बिंबवले गेले, त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व घडले. न्याय, शासन आणि माणूसकी यांचे धडे शिवरायांनी गिरवले. यातूनच त्यांनी लोकहिताची कामे सुरु केली. शत्रूंवर आपला वचक बसवला. गड किल्ल्यांना जिंकत शिवरायांनी आपल्या राज्याला वाढवले. मजबूत प्रशासन व्यवस्था निर्माण केली. जिजाऊ मातेच्या मदतीने, त्यांच्या आशीर्वादाने स्वराज्य विस्तारीत झाले. प्रत्येक वेळी शिवाजीराजांनी जिजाऊ मातेचा आदेश महत्त्वाचा मानत त्यांच्याशी सल्ला मसलत करुन, आपला संकल्प सिद्धीस नेला. हा

जिजाऊंचा स्वराज्य धर्म स्त्रीशक्तीला सबळ करणारा होता. स्त्री सबलीकरणाचा पाया त्यांनी रचला होता. आयुष्यभर शिवाजीमहाराज त्याच वाटेने चालत होते. त्यातून त्यांनी स्त्रियांना खऱ्या अर्थाने न्याय दिला.

शिवरायांनी जसा स्त्रियांना न्याय दिला तसाच त्यांनी प्रत्येक वेळी जनकल्याणाचा विचार केला. मोहिमेच्या वेळी, संघर्ष्याच्या वेळी शिवाजीराजानी जनतेला उगाच त्रास दिला नाही. सैनिकांचीही त्यांनी काळजी घेतली, सैनिकांच्या कुटुंबाला शिवबांनी महत्त्व दिले. त्यामुळे शिवराय बहुजन समाजाचे राजे झाले. हे सर्व संस्कार जिजाऊ आणि शहाजीराजांनी शिवाजी महाराजांना दिले होते. मग त्यांनी ते संस्कार स्वराज्याला बहाल केले. सगळ्या संत, महात्म्यांना आपले मानले. म्हणून हा स्वराज्य धर्म उदयाला आला. शिवरायांनी आपल्या प्रत्येक पावलात आई वडिलांचा खऱ्या अर्थाने उद्धार केला. अशाप्रकारे शिवाजीराजांनी स्वराज्यात जनहिताचे कार्य केले.

हे स्वराज्य हळूहळू वाढवत असताना आदिलशाहाने आपले मातब्बर सरदार शहाजीराजे यांना कपटाने अवमानास्पद वागणूक देत कैद केले. अशा वेळी शिवाजीराजांनी स्वराज्याचे काम थांबवून, एक अचाट युक्ती लढवली. त्यांनी थेट मुघल बादशाहा शाहजहान याच्याशी संधान बांधले त्यानुसार पत्रव्यवहार सुरू झाले. या हालचालींमुळे शाहजहान विजापूरवर

स्वारी करेल अशी भिती आदिलशाहाच्या मनात तयार झाली. मग आदिलशाहाने दबावात येऊन शहाजीराजांची सुटका केली. आपल्या आई वडिलांसाठी पुत्र काय करु शकतो. त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्याचप्रमाणे शहाजीराजे कालवश झाल्यावर जिजाऊ माता सती जाण्याचा निश्चय करतात तेव्हा त्यांचे पुत्र शिवाजी सती जाण्यापासून आईला विरोध करतात. हे स्वराज्य आपल्या प्रेरणेतून निर्माण झाले आहे. मग या स्वराज्यात जिजामाता नसतील, तर या स्वराज्याला अर्थच उरणार नाही. असे म्हणत शिवाजीराजांनी जिजाऊंना रोखले. असा हा शिवबांचा आई प्रति भक्तीमय प्रेमभाव होता. म्हणून शिवछत्रपतींनी १६७४ ला स्वराज्याचा राज्याभिषेक घडवून आणला आणि मातोश्रींचा आशीर्वाद घेतला. म्हणून शिवाजी महाराज आदर्श पुत्रही आहेत.

शिवाजी महाराजांच्या या संस्कारातून बऱ्याच गोष्टी आपल्याला घेण्यासारख्या आहेत. आजच्या पालकांनी मुलांना अशाप्रकारे मानवतेचे, कौटुंबिक एकोप्याचे संस्कार द्यावेत. चांगल्या गोष्टीसाठी त्यांना मार्गदर्शन करावे. चुकीची गोष्ट झाल्यस त्यांना समज द्यावी. त्याकरता पालक म्हणून कौटुंबिक जीवत तथा सार्वजनिक जीवत आपले वर्तन चांगले ठेवावे. गरीब श्रीमंत असा भेद न ठेवता प्रत्येकाशी सारखेपणाने वागावे. वाईट गोष्टींचे समर्थन करु नये. तरच मुलांच्या मनावर उत्तम संस्कार होऊ शकतात.

त्यामुळे आपलं मुलं पुढे जाऊन समाजात वाईट कृत्य करणार नाही. आज या समाजाला अशाच संस्कारांची फार गरज आहे. हा संस्कारांचा आदर्श आपण सर्वांनी शिवचरित्रातून घ्यावा, तरच आपण आपल्याला शिवाजी महाराजांचे भक्त म्हणू शकतो. या आदर्शाचा विचार प्रत्येकाने करावा. म्हणून मी 'शहाजीराजे, जिजाऊ आणि हाल्लीचे आई वडील' असा विषय आपल्या पुढे ठेवाला आहे. याचा आपण जरुर विचार करावा.

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या. साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820 (Whatsapp)